सुविचार
अगर गुझे से बहुत डर लगता है
तो अपनी आँखे बन्द कर लेना
समझदारी नहीं है ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र
दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/ गुरुवार दि. २० जून २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१३० ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## आगीत पुस्तके जळू शकतात, पण ज्ञानाचा नाश होत नाही



नालंदा : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी बिहारच्या राजगीर मधील ऐतिहासिक नालंदा विद्यापीठाच्या नवीन कॅम्पसचे आज उद्घाटन केले. सकाळी नालंदा विद्यापीठात पोहोचलेल्या पंतप्रधान मोदींनी सर्वप्रथम विद्यापीठाच्या ऐतिहासिक वारसा स्थळाची पाहणी केली. त्यानंतर त्यांनी नवीन कॅम्पसचे उद्घाटन केले. यावेळी बोलताना मोदी म्हणाले की, केवळ भारताचाच नाही तर जगातील अनेक देशांचा वारसा नालंदाशी जोडला गेला आहे. नालंदा विद्यापीठाकडून असे शिकता येते की, आगीच्या ज्वाळांमध्ये पुस्तके जळतात, पण ज्ञान मात्र कायम अबाधित राहते.

तिस-यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतल्यानंतर पहिल्या १० दिवसांतच मला ऐतिहासिक वारसा लाभलेल्या नालंदाला भेट देण्याची संधी मिळाली. ही बाब मी भारताच्या विकासाच्या प्रवासाचे एक शुभ चिन्ह म्हणून मानतो. नालंदा ही एक ओळख आहे, सन्मान आहे. नालंदा एक मूल्य आहे, एक मंत्र आहे, एक अभिमान आहे, एक कथा आहे. नालंदा हे एक असे सत्य आहे जे स्पष्टपणे सांगते की, अग्नीच्या ज्वाळांमध्ये पुस्तके जळू शकतात, परंतु अग्नीच्या ज्वाला ज्ञानाचा नाश करू शकत नाहीत. हे नवीन कॅम्पस भारताची नवी क्षमता जगाला दाखवेल. नालंदा दाखवून देईल की, जी राष्ट्रे भक्कम मानवी मूल्यांवर आधारित असतात, (पान ५ वर)

### जम्मू-काश्मीरच्या चकमकीत २ दहशतवाद्यांचा खात्मा

बारामुल्ला : गेल्या काही दिवसांपासून जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी कारवायांमध्ये वाढ झाली आहे. या पार्श्वभूमीवर सुरक्षा दलांनी राज्यात बंदोबस्त वाढवला आहे. अशातच, आज काश्मीर खोऱ्यातील बारामुल्ला येथे सुरक्षा दल आणि दहशतवाद्यांमध्ये चकमक झाली. या चकमकीत सुरक्षा दलांनी दोन दहशतवाद्यांचा खात्मा केला असून, एक एसओजी (जम्मू-काश्मीर पोलीस) जवान जखमी झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भारतीय लष्कर, सीआरपीएफ आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या संयुक्त पथकाकडून ही कारवाई करण्यात येत आहे. ही कारवाई सुरू असल्याची माहिती काश्मीर झोन पोलिसांनी दिली.

एका पोलीस अधिकाऱ्याने सांगितले (पान ५ वर)

## मुंबईतील ५० रुग्णालये उडवून देण्याची धमकी

मुंबई : प्रतिनिधी- मुंबईतील ५० हून अधिक रुग्णालयांना बॉम्बने उडविण्याच्या धमकीचा मेल पाठवण्यात आला आहे. मुंबई पोलिसांच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार मुंबईतील अनेक प्रसिद्ध रुग्णालयांत धमकीचे ई-मेल आले आहेत. ई-मेल पाठवणा-याने रुग्णालयांच्या बेड आणि बाथरूमच्या खाली बॉम्ब ठेवून रुग्णालय उडविण्याची धमकी दिली आहे.

धमकीचा ई-मेल पाठवणा-याने आपली ओळख लपविण्यासाठी व्हीपीएन नेटवर्कचा वापर करून सर्व ई-मेल पाठवले आहेत. हा ई-मेल मुंबईतील जसलोक हॉस्पिटल, रहेजा हॉस्पिटल, सेव्हन हिल हॉस्पिटल, कोहिनूर हॉस्पिटल, केईएम हॉस्पिटल, जेजे हॉस्पिटल, सेंट जॉर्ज हॉस्पिटल




आणि अन्य हॉस्पिटलमध्ये आल्याचीही माहिती सूत्रांनी दिली.

एकाच ई-मेलमध्ये लिहिलेला हा धमकीचा ई-मेल ५० हून अधिक रुग्णालयांना पाठवण्यात आला आहे, असे एका पोलिस अधिका-याने सांगितले. रुग्णालयांना धमकीचा ई-मेल मिळताच त्यांनी पोलिसांना कळवले. यानंतर पोलिस आणि बॉम्ब निकामी पथकाने रुग्णालयात जाऊन तपासणी केली असता पोलिसांना कोणतीही संशयास्पद वस्तू आढळून आली नाही.

रुग्णालयांपाठोपाठ आता महाविद्यालयांनाही धमकीचे ई-मेल आले आहेत. मुंबईच्या हिंदुजा कॉलेज ऑफ कॉमर्समध्ये धमकीचा ई-मेल आला. ई-मेल करणा-याने कॉलेज (पान ५ वर)

## मुंबई हे देशातील सर्वाधिक महाग शहर

मुंबई : स्वप्नांचे शहर म्हणून मुंबईला ओळखले जाते. मुंबईत रोज अनेक लोक आपली स्वप्न पूर्ण करण्यासाठी येतात. गाव-खेड्यातून, परदेशातून मुंबईत लोक पोटाची खळगी भरायला येतात. तर अनेकजण शिकण्यासाठी येतात. देशाची आर्थिक राजधानी म्हणून मुंबईला ओळखले जाते. हेच शहर परदेशी नागरिकांसाठी राहण्यासाठी सर्वाधिक महाग शहर असल्याचे समोर आले आहे.

मुंबई १३६ क्रमाकांवर मर्सरच्या कॉस्ट ऑफ लिव्हिंगच्या सर्वेक्षणानुसार, वैयक्तिक सुविधा, गरजा, वाहतूक, घरभाडे, जेवणाचा



खर्च याबाबतीत मुंबई महाग आहे. इतर शहरांच्या तुलनेत मुंबईत या सर्व गोष्टींसाठी जास्त पैसे मोजावे लागतात. तर जागतिक पातळीवर हाँगकाँग हे सर्वात महागडे शहर आहे सर्वात महागड्या शहरांच्या यादीत मुंबई १३६ क्रमाकांवर आहे.

मागच्या वर्षी मुंबई १४७ क्रमांकावर होती. तर दिल्ली १६४ क्रमांकावर आहे. चेन्नई १८९ स्थानावर तर बंगळुरु १९५ क्रमांकावर आहे. हैदराबाद २०२ क्रमांकावर तर पुणे २०५ क्रमाकांवर आहे. मुंबई हे देशातील सर्वात महागडे शहर आहे. मुंबई जरी रँकिंगमध्ये महाग शहर असले तरीही मुंबईत राहणे परवडणारे आहे.

देशांतर्गत असलेली वस्तूंची मागणी तसेच सेवा या क्षेत्रामुळे भारताची अर्थव्यवस्था स्थिर आहे, जागतिक गृहनिर्माण खर्च आणि महागाई वाढल्याने राहणीमान सुधारणे गरजेचे आहे. (पान ५ वर)

## अरविंद केजरीवाल तुरुंगातच राहणार, न्यायालयाने ३ जुलैपर्यंत केली कोठडीत वाढ


नवी दिल्ली : दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांना राऊस ॲव्हेन्यू कोर्टाकडून आणखी एक धक्का बसला आहे. न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन देण्यास नकार दिला असून त्यांची न्यायालयीन कोठडी ३ जुलैपर्यंत वाढवली आहे. केजरीवाल यांच्या जामीन याचिकेवर न्यायालयात आज सुनावणी पार पडली. यात केजरीवाल यांच्या वतीने ज्येष्ठ वकील विक्रम चौधरी यांनी युक्तिवाद केला तर अंमलबजावणी संचालनालयातर्फे (ईडी) एस. व्ही. राजू यांनी बाजू मांडली. सुनावणीनंतर न्यायालयाने केजरीवाल यांना जामीन देण्यास नकार दिला.



केजरीवाल यांच्यासोबतच दुसरा आरोपी विनोद चौहानच्या न्यायालयीन कोठडीतही वाढ करण्यात आली आहे. केजरीवाल यांच्या न्यायालयीन कोठडीची मुदत संपल्यानंतर त्यांना तिहार तुरुंगातून व्हीडीओ कॉन्फरन्सद्वारे न्यायालयात हजर करण्यात आले होते. दरम्यान, कोर्टातील सुनावणीदरम्यान न्यायाधीशांनी केजरीवाल यांनाही त्यांचे म्हणणे मांडण्यास (पान ५ वर)

## जागतिक स्तरावर भारतीय अर्थव्यवस्था सुसाट

नवी दिल्ली : - भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सध्या संमिश्र परिस्थिती दिसत आहे. एकीकडे देशाचे जीडीपी आकडे सातत्याने उत्साहवर्धक असताना जागतिक पातळीवरही देशासाठी आव्हानात्मक स्थिती दिसत आहे. यादरम्यान, जगभरातील रेटिंग एजन्सी आणि वित्तीय संस्थाही या वर्षासाठी भारताच्या आर्थिक विकासाबाबत (जीडीपी) सकारात्मक अंदाज दर्शवत असून चालू आर्थिक वर्षात देशाचा विकास दर ७ टक्क्यांपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे.



संपूर्ण जगाला भारतीय अर्थव्यवस्थेच्या सुसाट वेगवान वाटचालीची खात्री पटली आहे. अलीकडेच एकीकडे सरकारने ८ टक्क्यांहून अधिक विकास दराचे आकडे जाहीर केले तर चालू आर्थिक वर्षासाठी जगभरातील रेटिंग एजन्सींनी भारताचा विकास दर सर्वात वेगवान असल्याचा विश्वास वर्तवला. भारतीय इकॉनॉमीच्या तुलनेत अमेरिका आणि युरोपचा विकास दर खूपच मागे तर चीनचा वेग सतत मंदावत आहे.

आता जागतिक रेटिंग एजन्सी फिच रेटिंग्सने मंगळवारी चालू आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये भारताचा विकास दर ७.२ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला, जो यापूर्वी केवळ ७ टक्के होता. ग्राहक खर्चात सुधारणा आणि गुंतवणुकीतील वाढीचा हवाला (पान ५ वर)




## बॉम्बच्या अफवा पसरवणाऱ्यांवर विमान प्रवास बंदी लादली जाणार

नवी दिल्ली : देशातील विमानतळ आणि विमान कंपन्यांना सतत बॉम्बच्या धमक्या येत असताना नागरी विमान वाहतूक सुरक्षा ब्युरोने (बीसीएएस) कठोर निर्णय घेतला आहे. नियामक संस्था खोट्या धमक्या देणा-या व्यक्तींना ५ वर्षांसाठी विमान प्रवासावर बंदी घालण्याचा विचार करत आहे. बीसीएएसशी संबंधित एका अधिका-याने सांगितले की, गेल्या काही महिन्यांत बॉम्बच्या खोट्या धमक्या देण्याच्या प्रकरणांमध्ये वाढ झाली आहे, त्यामुळे संस्था खोडकर लोकांवर कारवाई करण्याचा विचार करत आहे.

सूत्रांच्या मते, विमानतळ




आणि विमान कंपन्यांना खोटी माहिती दिल्याबद्दल देशभरातून आतापर्यंत ६ जणांना अटक करण्यात आली आहे. तर मेरठमधील एका अल्पवयीन मुलाने दिल्ली विमानतळावर बॉम्ब असल्याची माहिती दिली होती. त्याला बाल न्याय मंडळासमोर समुपदेश करून सोडण्यात आले आहे. खोट्या अफवांमुळे प्रवासी आणि सुरक्षा यंत्रणांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे, असे संघटनेच्या अधिका-यांनी सांगितले. आतापर्यंत ४१ विमानतळांना मिळाल्या धमक्या दिल्ली, मुंबई, चेन्नई, बंगळुरू, लखनौ, वाराणसी, कोईम्बतूर, वडोदरा, जयपूर, नागपूर, पुणे, पाटणा आणि जबलपूरसह देशातील सुमारे ४१ विमानतळांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या आहेत. मात्र, तपासादरम्यान या धमक्या खोट्या असल्याचे समोर आले आहे. अफवेमुळे अनेक विमानांना उशीर झाला, तर अनेक विमाने आपत्कालीन परिस्थितीत अन्य विमानतळांवर वळवण्यात आली.

### अनाधिकृत होर्डिंगधारकांसह मालमत्ताधारकांवर मनपा कार्यवाही करणार

लातूर/प्रतिनिधी: घाटकोपर मुंबई येथे सोसाटयाचा वारा व वादळामुळे होर्डिंग कोसळुन अपघात होऊन जिवित हानी झालेली आहे. व नागपूर-रत्नागिरी राष्ट्रीय महामार्गावरील महादेववाडी पाटीनजीक येथील दिशा व अंतर दर्शविणारा फलक कोसळुन अपघात होऊन जिवित व वित्त हानी झालेली आहे.

त्याअनुषंगाने लातूर शहरातील ज्या खाजगी मालमत्तांवर अनधिकृत होर्डीग्ज लावण्यात आलेले आहेत, सदर होर्डीग्ज हे संपूर्ण स्ट्रक्चरसहीत तात्काळ काढून घेणेसाठी नोटीस देवून मुदत देण्यात आली होती. तथापि अदयापही बरेच होर्डीग्ज न काढल्याचे निदर्शनास येत आहे. तरी सदर होर्डीग्ज हे निदर्शनास आल्यास सदर (पान ५ वर)

## एनडीए सरकार कधीहि कोसळू शकते :गांधी

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वातील एनडीए सरकार तिस-या कार्यकाळात अस्तित्वासाठी संघर्ष करत आहे. केंद्रातील सत्ताधारी एनडीएकडे संख्याबळ खूप कमी आहे. जराही गडबड झाली तरी सरकार कोसळू शकते असा दावा काँग्रेस खासदार राहुल गांधी यांनी केला. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे विधान केले.



राहुल गांधी म्हणाले की, सरकारकडे संख्याबळ इतकं कमी आहे त्यामुळे जरा काही गडबड झाली तरी सरकार पडू शकते. एनडीएतील घटक पक्षांना दुस-या बाजूला जावं लागू शकते. एनडीएतील काही पक्ष आमच्या संपर्कात आहेत. मोदी यांच्या नेतृत्वात ते असमाधानी आहेत असं त्यांनी सांगितले. परंतु एनडीएतील कुठले पक्ष संपर्कात आहेत त्याची नावे राहुल गांधी यांनी सांगितली नाहीत.

तसेच द्वेषपूर्ण राजकारण हे भारतीय जनतेनं नाकारलं आहे. २०१४ आणि २०१९ या कार्यकाळात ज्याप्रकारे नरेंद्र मोदींनी (पान ५ वर)

## आज देवणी येथे शेतकरी संघटनेच्यावतीने चक्का जाम आंदोलन करण्यात आले



लातूर / प्रतिनिधी- शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष आनंद जीवने यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनामध्ये सर्वच पक्षांनी शेतकरी संघटनेला पाठिंबा देऊन शेतकरी संघटनेच्या आंदोलना सोबत खांद्याला खांदा लावून सहभाग नोंदविला. आंदोलन मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विविध पक्षांच्या मान्यवरांचे मनोगत व्यक्त करण्यात आले.

शेतकरी संघटनेच्या वतीने प्रशासनास निवेदन देण्यात आले त्या निवेदनात पिक कर्जाचा व्याज परतावा मिळावा, पिक विमा, अनुदान लागु करुन शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावे , दिवसा ८ तास लाईट मिळावे. अनधिकृत पणे पिक कर्ज वसुली च्या नावा खाली पिक कर्जदाराचे बॅक खाते होल्ड केले आहे.त्याची चौकशी करून बँक अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी हे मागण्या मान्य नाही झाल्यास शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

या आंदोलनास सुरेंद्र आंबुलगे , मिथुन दिवे सर, गजानन ऊजळबे विकास नमनगे, मेळकुंदे मामा,भंडे दत्ता अर्जुने व अरविंद जी भातंबरे सर अमर अण्णा मुर्के अजित बेळकोने सोमनाथ लूले देविदास पतंगे शरण लुले अरुण पाटील औदुंबर पांचाळ माधवराव जी बिरादार श्रीमंतांना लुले योगेश जी तगरखेडे चेतनजी मिटकरी मल्लिकार्जुन ईश्वरशेटे इब्राहिम तांबोळी करीम भाई शेख व तांबोळी परिवार खुरेशी चंद्रकांत माने पाटील पांडुरंग जी कदम साहेब कल्याण भाऊ धनुरे रमेश जी कोतवाल कोयले सर लक्ष्मण रणदिवे गिरधर जी गायकवाड साबणे सर सिद्राम डोंगरे बालाजी पाटील कालिदास बंडे किशोर जी पाटील पाटील पाटील विळेगावकर संजय जी अंबुलगेअजम भाई उंटवाले असे अनेक शेतकरी देवणी शहर व तालुक्यातून या रास्ता रोको आंदोलनात उपस्थित होते.

## लातूर जिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा

### आरोग्य मंत्री तानाजी सावंत यांचे आ.अमित देशमुख यांनी मानले आभार

लातूर (प्रतिनिधी): महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने जागेची किंमत म्हणून लातूर कृषी महाविद्यालयास ३ कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये वर्ग करण्यास मंजुरी दिली असल्यामुळे लातूर येथील जिल्हा रुग्णालय उभारणीचा मार्ग मोकळा झाला आहे. यासाठी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.



या संदर्भातील अधिक माहिती अशी, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांनी लातूर व परिसरातील नागरिकांना चांगल्या आरोग्य सोयी सुविधा मिळाव्यात, वैद्यकीय क्षेत्रात जाणाऱ्या लातूरच्या विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय व्हावी म्हणून लातूर येथे जिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मंजूर केले होते. त्यानंतर त्यांच्याच कार्यकाळात लातूर साठी स्वतंत्र जिल्हा रुग्णालयही मंजूर झाले, मात्र या रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होत नसल्याने, या रुग्णालयाची उभारणी करण्यात अडचण निर्माण झाली होती. माजी मंत्री अमित विलासराव देशमुख यांनी यासंदर्भात पाठपुरावा करून लातूर मधील कृषी महाविद्यालयाची १० एकर जागा रुग्णालय उभारणीसाठी मंजूर करून घेतली होती, कृषी महाविद्यालयाची जागा रुग्णालय उभारणीसाठी उपलब्ध झाली मात्र त्या जागेची किंमत शासकीय स्तरावरून कृषी महाविद्यालयाकडे पर्यायाने वसंतराव नाईक कृषि विद्यापीठाकडे वर्ग करण्यात तांत्रिक अडचणी येत होत्या, सदरील अडचण दूर करण्यासाठी माजी (पान ५ वर)

दैनिक **यशवंत**

गुरुवार दि.२० जुन २०२४

# अहमदपूर/चाकूर परिसर

E-mail :- yashahmedpur@gmail.com संपर्क मो.९८५०२७३०४७, ९८२३११२९०७



# महात्मा गांधी महाविद्यालयाचे एमएचटी –सीईटी परीक्षेत घवघवीत यश








अहमदपूर दि.१९(कारामुंगीकर) महात्मा गांधी महाविद्यालयाचे एमएचटी –सीईटी परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, शैक्षणिक वर्ष २०२४–२५ करीता घेण्यात आलेल्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून या परीक्षेत महात्मा गांधी महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर ने घवघवीत यश संपादन केले आहे.अभियांत्रिकी गटात पीसीएम ग्रुपमध्ये महाविद्यालयात पियुष कनकदंडे ९९.११२५७६१ पर्सेंटाईल घेऊन सर्वप्रथम, वर्षा कनकदंडे ९८.३९५८०७५ सर्वद्वितीय तर वरदराज आरदवाड ९०.५४६६६३९ सर्वतृतीय आणि औषधनिर्माणशास्त्र, कृषी गटात पीसीबी ग्रुपमध्ये आदित्य कंदे ९८.०६४२६८२ पर्सेंटाईल घेऊन सर्वप्रथम, तेजस्विनी गित्ते ९७.४२५७१४१ सर्वद्वितीय तर भाग्यश्री मुंढे ९७.१०८७२५० सर्वतृतीय आले असुन २१ विद्यार्थ्यांना ८० पेक्षा जास्त पर्सेंटाईल प्राप्त झाले आहे.

या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष ड. किशनराव बेंडकुळे, सचिव ड पी. डी. कदम,उपाध्यक्ष ॲड विजयकुमार देशमुख, उपाध्यक्ष युवराज पाटील, कोषाध्यक्ष रामचंद्रराव शेळके, सहसचिव ॲड वसंतराव फड, सहसचिव सुरेशराव देशमुख, सर्व संचालक, प्राचार्य डॉ. एस.आर.शेळके , उपप्राचार्य प्रा. पी. बी. बाभुळगांवकर, सीईटी सेल प्रमुख प्रा.हेमंत पाटील, पर्यवेक्षक प्रा.डॉ.जे. पी. कुलकर्णी, प्रा. ए. एन. शिंदे, कार्यालयीन अधिक्षक डी.के.गाजरे , प्रा.डॉ.जे. पी. कुलकर्णी, यासह सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# श्री संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मतिमंद विद्यालय व श्री पांडुरंग निवासी मूकबधिर विद्यालय अहमदपूर येथे प्रवेशोत्सव साजरा



अहमदपूर दि.१९(कारामुंगीकर) श्री संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मतिमंद विद्यालय व श्री पांडुरंग निवासी मूकबधिर विद्यालय अहमदपूर येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला.

याबाबत अधिक माहिती अशी की, अहमदपूर तालुक्यातील श्री संत ज्ञानेश्वर महाराज निवासी मतिमंद विद्यालय व श्री पांडुरंग निवासी मूकबधिर विद्यालय अहमदपूर येथे प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजीराव पालेपाड तहसीलदार अहमदपूर, कार्यक्रमाचे अध्यक्ष विकास तपशाळे तसेच शेकडे व केंद्र प्रमुख मठपती , मोघे उपस्थित होते आज शाळेतील प्रवेशोत्सव निम्मित शाळेत विद्यार्थ्यांचे मा तहसीलदार साहेब यांच्या हस्ते गुलाबाचे फुल देवून शाळेत स्वागत करण्यात आले ,त्याच बरोबर शाळेतील पहिल्या दिवशी शाळेत १०० टक्के उपस्थिती पाहून साहेबांनी सर्वांचे कौतुक केले तसेच मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.

नवीन पालक व विद्यार्थी यांचे मान्यवरांच्या हस्ते शाल व हार घालून शाळेत स्वागत करण्यात आले.

यावेळी मान्यवरांनी दिव्यांग मुलांना विशेष शाळेतच का पाठवावे दिव्यांग मुलांना विशेष शाळेची आवश्यकता काय या विषयी मार्गदर्शन केले सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी विद्यार्थी शाळेत आणण्यासाठी परिश्रम घेतले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

सदरील कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# दयानंद विद्यालयात विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत



हाडोळती दि.१९(नागसेन गायकवाड) दयानंद विद्यालयात विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

याबाबत अधिक माहिती अशी की, हडोळती तालुका अहमदपूर येथील दयानंद विद्यालय शाळेत शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष कौडगावे जी.व्ही.हे होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी प्राचार्य व्यंकटराव मुळके,पोलीस पाटील बालाजी मिरकले, उत्तमराव यादव, शिवचंद्र क्षेत्रफळे ,कांबळे रमेश, कलवले पी.आर., शेख एस. एम., पठाण मुस्तफा, राम ढोबळे, दत्तात्रय सूर्यवंशी, मुख्याध्यापक अर्जुन कानवटे, पर्यवेक्षक अशोक कोटसूळवार आदी मान्यवर उपस्थित होते. गावात प्रभात फेरी काढून वृक्षारोपणाचे महत्त्व व शिक्षणाचे महत्त्व विद्यार्थी, पालकांना सांगण्यात आले. प्रभात फेरीनंतर शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करून एक मूल– एक वृक्ष ही योजना राबविण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना शालेय पुस्तकाचे उपस्थित मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आले. त्यावेळी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

# सेवानिवृतीमुळे समाजिक कार्याला वेळ मिळू शकतो– नरसिंग घोडके



अहमदपूर दि१९(कारामुंगीकर) सेवानिवृतीमुळे समाजिक कार्याला वेळ मिळू शकतो असे प्रतिपादन लसाकमचे नरसिंग घोडके यांनी केले.

याबाबत अधिक माहिती अशी की, भारतातील बहुजन – दलितांना महात्मा ज्योतीराव फुले यांनी शिक्षण दिले, राजर्षी शाहू महाराजांनी आरक्षण दिले आणि परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संरक्षण दिले. म्हणूनच आपणास चांगले दिवस आले आहेत . आपण महापुरूषांच्या ,चळवळीचे लाभार्थी आहोत. ही जाणिव ठेवून समाजातील अधिकारी – कर्मचारी वर्गाने आपल्या समाजाच्या उध्दारासाठी आपली बुध्दी,वेळ आणि पैसा खर्च केला पाहिजे. महापुरुषांची विचारधारा आणि चळवळीमुळेच बहुजन – दलीतांचा उध्दार झाला. हे लक्षात ठेवून आपण सर्वांनी त्या विचारांची चळवळ चालविलेली पाहिजे. सेवानिवृत्ती नंतर तर समाजऋण फेडण्या साठी खूप वेळ मिळू शकतो.

तो वेळ त्यांनी द्यावा. असे अवाहन म लसाकम म चे नियंत्रक नरसिंग घोडके यांनी केले आहे.

लातूरचे रहिवासी आणि म लसाकम म चे सदस्य अंगद नेटके हे देगलूर ( जि. नांदेड ) येथून नायब तहसीलदार या पदावरून सेवानिवृत्त झाल्या बद्दल म लसाकम म च्या वतीने त्यांचा शाल, पुष्पाहार आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखीत म जातीसंस्थेचे उच्चाटन म हा ग्रंथ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी नेटके यांना शुभेच्छा देताना घोडके बोलत होते. ते पुढे म्हणाले की, सेवानिवृत्तांना पेन्शन देण्याची तरतूद डॉ.आंबेडकरांनी केली आहे. त्यामुळे सेवानिवृत्ती नंतरही आपणास पेन्शन मिळते. म्हणून डॉ.आंबेडकरांची चळवळ चालविण्याची जबादारी पेन्शनधारकाची अधिक आहे. ते पूर्णवेळ कार्यकर्ते म्हणून भूमिका बजावू शकतात.असेही ते म्हणाले. सत्काराला उत्तर देताना आपण यथाशक्ती चळवळीस योगदान देऊ अशी ग्वाही अंगद नेटके यांनी दिली. यावेळी प्रा.डॉ. शिवाजी जवळगेकर, शिरीष दिवेकर, मधुकर दुवे, मारोती गायकवाड, नागनाथ डोंगरे आदींची समायोचित भाषणे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचल नारायण कांबळे यांनी केले तर बबीताताई नेटके यांनी सर्वांचे आभार मानले.

या कार्यक्रमास म लसाकम चे कार्यकर्ते म दत्ता कांबळे, मधुकर दुवे, राजेश तोगरे, नागनाथ लोंढे, राजेंद्र हजारे विजयकुमार सूर्यवंशी, एल.आर. कांबळे , सौ. लक्ष्मी घोडके यांच्यासह अन्य कार्यकर्ते उपस्थित होते.

शेवटी बबीताताई नेटके यांच्या आभारप्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी लसाकमचे पदाधिकारी, सदस्य मोठ्या संख्येनी उपस्थित होते.

# शिक्षकांच्या कर्तव्यपूर्तीचा आनंद म्हणजे निरोप समारंभ–आ.विक्रम काळे




अहमदपूर दि.१९(कारामुंगीकर) शिक्षकाने आयुष्यभर प्रामाणिकपणे केलेले विद्यादानाचे कार्य याच्या कर्तव्यपूर्तीचा आनंद म्हणजे शिक्षकांचा निरोप समारंभ असतो असे प्रतिपादन मराठवाडा विभागाचे शिक्षक आमदार विक्रम काळे यांनी अहमदपूर येथे यशवंत विद्यालयातील एच एस सी वोकेशनल विभागाचे प्राध्यापक अनिल चवळे यांच्या निरोप समारंभ बोलताना व्यक्त केले या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी टागोर शिक्षण समितीचे सचिव शिक्षण महर्षी डीबी लोहारे गुरुजी हे होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून माजी मंत्री बाळासाहेब जाधव , डॉ.ओमप्रकाश मोतीपवळे ,संस्थेचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर,उपाध्यक्ष डॉ. भालचंद्र पैके, सहसचिव डॉ .सौ सुनीता ताई चवळे, सुप्रसिद्ध वास्तुतज्ञ डॉ.संतोष तोडकर, शिवानंद हिंगणे हे उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना आमदार विक्रम काळे यांनी शिक्षक हा समाजाचा कणा आहे. समाजात सकारात्मक भाव निर्माण करण्याचे कार्य शिक्षक करत असतो असे प्रतिपादन केले.

माजी मंत्री बाळासाहेब जाधव यांनी सर्वच शिक्षकांचा कार्याचा गौरव करताना आजही शिक्षक ग्रामीण भागात वाडी तांड्यावर शिक्षणासोबतच सामाजिक भाव व शैक्षणिक मूल्य जोपासण्याचे कार्य करत आहेत असे मत व्यक्त केले. त्यांनी यशवंत परिवाराच्या शैक्षणिक कार्याचा व डी.बी. लोहारे गुरुजी यांच्या कार्याचाही गौरव केला.

ज्येष्ठ पत्रकार तथा रोटीचे माजी प्रांतपाल डॉक्टर ओमप्रकाश मोतीपवळे यांनी शिक्षकांचे सामाजिक मूल्य खूप मोठे आहे शिक्षक हा समाजाचा महत्वपूर्ण घटक असून येणाऱ्या पिढ्यावर भारतीय संस्कार हे शिक्षकच करू शकतात. यामुळे या बदलत्या शैक्षणिक युगामध्ये शिक्षक व शैक्षणिक संस्थाचे महत्व कमी होत नाही असे मत व्यक्त केले.

यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांच्या हस्ते सेवापूर्ती बद्दल प्राध्यापक अनिल चवळे यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या सत्काराला उत्तर देताना अनिल चवळे यांनी यशवंत परिवार व अहमदपूर शहरवासी यांच्या बद्दल आपले ऋण व्यक्त केले.

अध्यक्षीय समारोप करताना शिक्षण महर्षी डीबी लोहारे गुरुजी यांनी प्रा अनिल चवळे यांच्या कार्याचा गौरव केला व त्यांच्या भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. शिक्षकांनी निवृत्तीनंतरही समाज व सामाजिक कार्यात अग्रेसर राहावे असे प्रतिपादन केले.

यशवंत विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन शिंदे उपमुख्याध्यापक घोटे पर्यवेक्षक अशोक पेद्येवाड पर्यवेक्षक राम तात्तापुरे हे यावेळी मंचावर उपस्थित होते

कार्यक्रमाचे प्रास्तावित उपप्राचार्य सय्यद एम यु यांनी केले मनोगत महेंद्र खंडागळे यांनी तर सूत्रसंचालन कपिल बिराजदार व आभार प्रा रवी इरफळे यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी शहरातील नागरी पत्रकार बांधव मान्यवर किती यशवंत परिवारातील सर्व शिक्षक बांधव व केतकर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. भालचंद्र नारायणराद चाटे यांनी केले. तर सूत्रसंचालन प्रा. श्रीहरी बेद्पाठक व प्रा. संदीप मुंढे यांनी केले तर अलीम शेख यांनी आभार मानले. डॉ. नारायणराव चाटे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित विविध कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी संजीवनी प्राथमिक, माध्यमिक व माहाविद्यालय तसेच डॉ. नारायणराद चाटे कॉलेज ऑफ फार्मसी व संस्थेमधील सर्व प्राध्यापकफ व कर्मचायांनी परिश्रम घेतले.

**तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी, अहमदपूर यांचे कार्यालयात**

जन्म–२/जन्म/मृत्यु विभाग

## जन्म नोंदनी प्रमाणपत्र जाहीरनामा

जा.क्र २०२४/दंडनीय/कावि/७३५ दि. १८.०६.२०२४

## जन्म नोंदनी प्रमाणपत्र जाहीरनामा

विषय : जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३/३ अन्वये जन्म नोंदणीचे आदेश होणे बाबत.

**जाहीरप्रगटन**

याव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार **सय्यद जबीनबेगम अहेमद,** यांनी स्वतः आई/वडील/मुलगा/मुलगी/भाऊ/बहिण नामे सय्यद जबीनबेगम अहेमद, यांचा जन्मव स्थळ व तसेच राहणार रा. अहमदपूर, अहमदपूर, ता. अहमदपूर जि. लातूर यांनी कलम १३/३ अन्वये जन्म मृत्यु नोंदणी कायदा अंतर्गत **सय्यद जबीनबेगम अहेमद** यांचा जन्म दि. १५/१२/१९६५ रोजी मौ. अहमदपूर, अहमदपूर ता. अहमदपूर येथे राहत्या घारी झाला असल्याने त्यांच्या जन्म तारखेची नोंदणी नगर परिषद कार्यालय, अहमदूपर, ता. अहमदपूर जि. लातूर येथे करणे कामी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी सदर जन्म / मृत्यु तारखेच्या नोंदणीसाठी कोणाचाही कुठलाही प्रकारचा आक्षेप अथवा हरकत असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्या पासून **३० दिवसांच्या** आत या न्यायालयात सादर करावयात. सदर कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप अथवा हरकत सादन न झाल्यास हे न्यायालय अर्जामध्ये ग्य तो आदेश पारीत करील. मुदतीनंतर आलेल्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही.

सही/–
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर**

सदरचे जाहीर प्रगटन हे आज दि. १८/०६/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी दिले.

प्रत : १. नगर परिषद कार्यालय, अहमदूपर,ता. अहमदपूर जि. लातूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरचे प्रगटन नोटिस बोर्ड वर डकवुन पंचनामा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करण्याची दक्षता घ्यावी. अहवाल मुदतीत प्राप्त न झाल्यास आपली काहीही हरकत नाही असे समजुन नियमानुसार पुढील कार्यवाही अनुसरण्यात येईल.

२. अर्जदार स्वतः नामे **सय्यद जबीनबेगम अहेमद, यांचा जन्म व तसेच** रा. अहमदपूर, अहमदपूर, ता. अहमदपूर यांना देवून कळविण्यात येते की, सदरच्या जाहीर प्रगटनास दैनिक वृत्तपत्रामध्ये स्वखर्चाने प्रसिद्धी देवून वृत्तपत्र या कार्यालयास सादर करावे.

शिक्का

सही/–
**तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, अहमदपूर**

**टागोर शिक्षण समिती, अहमदपूर**
**व्दारा संचलित**

## वसंत वसतिगृह कुमठा (बु.)

**ता. अहमदपूर जि. लातूर**

## स्वंयपाकी पाहिजेत

| अ.क्र. | पद | पात्रता | वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| ०१ | स्वंयपाकी | कामाचा अनुभव | मानधन |

**उमेदवारांनी दिनांक २४/०६/२०२४ रोजी कागदपत्रासह सकाळी ११.०० वाजता वसंत वसतिगृह कुमठा बु. ता. अहमदपूर जि. लातूर येथे स्वखर्चाने उपस्थित राहावे.**

**अधिक्षक** — वसंत वसतिगृह कुमठा बु.
**सचिव,** — टागोर शिक्षण समिती, अहमदपूर

**टी.सी. हरवली आहे**

**महादेव ध्रुपतराव यमगीर यांची** डॉ. शिवलिंग शिवाचार्य प्रतिष्ठान अध्यापक विद्यालय अहमदपूर बी. एड. टीसी, मार्क मेमो , दहावी मार्क मेमो, बारावी मार्क मेमो , आधार कार्ड, पॅन कार्ड, इत्यादी कागदपत्रे अहमदपूर गंगाखेड दरम्यान प्रवास करत असताना हरवली आहेत.

सदरील कागदपत्रे कोणास सापडल्यास खालील मोबाईल नंबर वर संपर्क करावा.
मो. नं. ९८६०७४४४१५.

## मनाचे सौंदर्य हेच खरे सौंदर्य

**टी.सी. हरवली आहे**

**कानवटे अंकिता चंद्रभान या नावाची** स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद येथील १२ वी पास ची टि.सी . व इतर कागदपत्रे लातूर ते शिरूर ताजबंद प्रवासात हरवली आहेत.

सदरील टी. सी. व कागदपत्रे कोणास सापडल्यास खालील मोबाईवर संपर्क करावा.
संपर्क मो .९७३०५५४७१८

## कबीरवाणी

**साई सेती साच चली,**
**औरा सूं सुध भाई**
**भावे लांबे केस कटी,**
**भावें घुरडी मुंडाई**

**भावार्थ** : संत कबीर म्हणतात कि, ईश्वर प्राप्तिसाठी मानवाने अनेक प्रयत्न केले आहेत कोणी केस राखुन तर कोणी केस काढुन ईश्वराप्रति भक्ति दाखवली आहे.

ईश्वराची भक्ती व्यक्त करताना तुम्ही लांब केस ठेवा किंवा मुंडन करा, पण तुम्ही जर प्रामाणिक राहून इतरांबरोबर प्रेमभावनेने वागलात तर सदैव ईश्वराच्या जवळ राहाल.

तुम्ही कितीही मुंडन केले, किंवा कितीही केस वाढवले पण जर तुमच्या मनात इतरांसाठी करुणा, दया, प्रेम नसेल तर तुमच्या या साऱ्या कर्मकांडाना काही अर्थ नाही. या दोह्याच्या माध्यमातुन कबीरांनी मानवावर प्रेम, दया करण्याचा उपदेश केला आहे.

**डॉ. कारामुंगीकर बालाजी**
**मो . ९८२३११२९०७**

यशवंत धाराशिव जिल्हा
गुरूवार दि. २० जून २०२४
३
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## अनुसूचित जातीच्या नवउद्योजकांनी स्टॅण्ड अप इंडियाचा लाभ घ्यावा - अरवत

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंतीनिमित्त केंद्र शासनाने अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांतील नव उद्योजकासाठी स्टॅन्ड अप इंडीया योजना सुरु केली आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून जिल्हयातील अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील १८ वर्षावरील नवउद्योजकांना १० टक्के स्वहिस्सा भरणा केल्यानंतर व बँकेने अर्जदारास स्टॅन्ड अप इंडिया योजनेतंर्गत ७५ टक्के कर्ज मंजूर केल्यानंतर उर्वरित फ्रॉन्ट एन्ड सबसिडी १५ टक्के राज्य शासन देणार आहे. त्यामुळे पात्र इच्छूक नवउद्योजकांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, धाराशिव या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन समाज कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

# गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कारामुळे त्यांचे मनोबल वाढून त्यांच्या कलागुणांना वाव मिळतो - डॉ. कटके

मुरुम दि.१९ (प्रतिनिधी) - माणसाने नेहमी एखाद्याच्या खऱ्या क्षमतेची जाणीव करून ती पूर्ण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक वाटचालीला दिशा देण्यासाठी विद्यार्थी, पालक व शिक्षक एकाच छताखाली आज या कार्यक्रमानिमित्ताने एकत्र आले आहेत. हा एक अद्भुत अनुभव आहे. अशा कार्यक्रमांमुळे शैक्षणिक क्षेत्रातील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढेल आणि त्यांच्या कलागुणांना वाव मिळेल, असे प्रतिपादन पुणे येथील आरोग्य विभागाचे माजी संचालक डॉ रायप्पा कटके यांनी दि.१९ जून रोजी केले.

शिक्षणाशिवाय विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास होऊ शकत नाही हा दृष्टिकोन सतत डोळ्यासमोर ठेवून शैक्षणिक क्षेत्रात अविरत कार्य करणारे दिवंगत सिद्राम गंगाराम शिंदे गुरुजी यांच्या स्मरणार्थ शहरातील श्रीराम मंगल कार्यालयात १० वी - १२ वीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा शिंदे परिवाराकडून विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी सरस्वतीच्या प्रतिमेस उपस्थितांच्या हस्ते पुष्पहार घालून दीप प्रज्वलन करण्यात आले. त्यावेळी ते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलत होते. यावेळी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रा. डॉ. महेश मोटे, धम्मचारी धम्मभूषण राम कांबळे, मुख्याध्यापक विजयकुमार देशमाने, मुख्याध्यापिका प्रमिला तुपेरे, मंकावती कांबळे, गंगाधर शिंदे, प्रा. रुक्मिणी शिंदे, बळीराम शिंदे, सीए शिवराज मिटकरी, हिमाचल प्रदेश येथे केंद्र सरकारच्या वस्त्र मंत्रालय विभागात टेक्स्टाईल इंजिनियर तथा मुरूमचे सुपुत्र शिवाजी शिंदे, माजी सुभेदार मेजर विजयकुमार शिंदे, रूपाली शिंदे, मंगल शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी शहरातील विविध शाळांमधील ७५ पेक्षा अधिक गुणवंत विद्यार्थी व पालकांचा सन्मानचिन्ह, शैक्षणिक साहित्य देवून मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात



आला. शिंदे कुटुंबीयांच्या वतीने जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या मुख्याध्यापिका मंकावती कांबळे यांच्याकडे शाळेतील गरजू विद्यार्थ्यांसाठी दोन सायकली भेट म्हणून देण्यात आल्या. यावेळी गंगाधर शिंदे, प्रा. रुक्मिणी शिंदे, प्रमिला तुपेरे, बळीराम शिंदे, मंकावती कांबळे, विजयकुमार देशमाने, प्रा. डॉ. महेश मोटे आदी आपल्या मनोगतात व्यक्त करताना म्हणाले की, गुणवंत विद्यार्थ्यांच्या यशामुळे आपापल्या शाळेची उंची वाढत असल्याबद्दल आनंद व्यक्त करून कौतुक केले. आई-वडील, गुरुजनांनी केलेले संस्कार कधीही विसरू नका. आपली प्रतिमा आपल्यालाच निर्माण करावी लागते. विमान जसे वरती जाते तसेच ते परत खालीही येते. त्यामुळे पाय जमिनीवर राहातील याचे भान ठेवा. आपल्या जीवनात समाजाचे स्थान महत्त्वाचे असल्यामुळे समाजाला परत द्यायला शिका. जसे मोठे व्हाल तसे अमिषांपासून, व्यसनांपासून दूर राहा. तुमचे वय स्वप्न बघण्याचे आहे, पण अशीच स्वप्न बघा जी झोपू देत नाहीत. आपले आरोग्य देखील तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळे तब्येत कमवा, ध्येय गाठण्याची जिद्द बाळगा. आम्हाला तुमचा अभिमान आहेच, पण आयुष्यात असे काही करा की आईवडील व गुरुजनांनाही तुमचा अभिमान वाटेल. गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्कार सोहळ्याचे मुख्य आयोजक असणाऱ्या शिवाजी शिंदे व रुपाली शिंदे यांचा डॉ. खाजालाल ढोबळे यांनी विशेष सत्कार केला. यावेळी शहरातील विविध दैनिकांच्या प्रतिनिधींचा विशेष सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमासाठी ऐश्वर्या शिंदे, सचिन शिंदे, ज्योतीराम शिंदे, वसंत शिंदे, धनराज शिंदे, तुकाराम शिंदे, गिरजप्पा कावळे, रेवण कटके, राजु कटके, अंबादास शिंदे, प्रवीण शिंदे, धोंडीबा शिंदे, जयश्री कांबळे, रेश्मा शिंदे, वैभव कटके आदींनी परिश्रम घेतले. प्रास्ताविक शिवाजी शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन अजिंक्य मुरूमकर यांनी तर आभार तात्याराव शिंदे यांनी मानले. यावेळी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पुन्हा केंद्र सरकारकडून खरीप पिकाची एमएसपी जाहीर करण्यास टाळाटाळ - ॲड. भोसले

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - खरीप पिकांची किमान आधारभूत किंमत जाहीर करण्यास केंद्र सरकार टाळाटाळ करत असल्यामुळे शेतकऱ्यांना पिकांच्या दराबाबत अंदाज येत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना पिकाची निवड व पेरणीच्या नियोजनाबाबत संभ्रम निर्माण झाला आहे असा स्पष्ट आरोप समाजवादी पार्टीचे प्रदेश महासचिव तथा प्रवक्ते ॲड. रेवण भोसले यांनी केला आहे.

केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या वतीने दरवर्षी १४ खरीप पिकांची एमएसपी जाहीर केली जाते. ही एमएसपी सरासरी पद्धतीने काढली जाते. ही प्रक्रिया दरवर्षी जानेवारीमध्ये सुरू होते. सीएसीपी ३१ मार्चपूर्वी त्यांचा अहवाल केंद्रीय कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाकडे सादर करते. या अहवालावर कॅबिनेट कमिटी निर्णय घेऊन एमएसपी जाहीर करते .ही संपूर्ण प्रक्रिया दरवर्षी किमान १५ एप्रिल ते ७ मे दरम्यान पूर्ण करून एमएसपी जाहीर करणे अपेक्षित आहे. या काळात एमएसपी जाहीर झाल्यास शेतकऱ्यांना खरीप पिकांची निवड व नियोजन करण्यास वेळ मिळतो. मात्र आता जूनचा तिसरा आठवडा सुरू झाला तरी अद्याप एमएसपी जाहीर न करून केंद्र सरकार पुन्हा शेतकरी विरोधी धोरण आखत असल्याचे दिसते असे स्पष्ट



मतही ॲड. भोसले यांनी व्यक्त केले आहे.

## व्यवसाय प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परंडा येथे सन २०२४-२५ या वर्षासाठी इलेक्ट्रीशिअन - २०, वेल्डर - २० व ड्रेसमेकींग - २० या व्यवसायाचे प्रवेश चालु आहेत.या व्यवसायासाठी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. इलेक्ट्रीशियन -१० वी पास आणि वेल्डर व ड्रेसमेकींगसाठी १० वी पास, नापास पात्र राहतील.तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या व्यवसायाच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज करावेत व अधिक माहितीसाठी iti.parandadvet.in या मेलवर संपर्क साधावा, असे आवाहन परंडा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे प्राचार्य यांनी केले आहे.

## मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेसाठी अर्ज करावेत

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती (धनगर वगळून) आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना राबविण्यात येणार आहे. सन २०२४-२५ या वर्षात महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त व्यावसायिक व बिगर व्यावसायिक महाविद्यालय, तंत्रनिकेतन येथे शासनाने निर्धारीत केलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह योजनेपासून वंचित असलेल्या इतर मागासवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना निवासी व शैक्षणिक सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी शासन निर्णयान्वये आदिवासी विकास विभागाच्या स्वयंम योजनेच्या धर्तीवर स्वतंत्र वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागू करण्यास मान्यता दिली आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शासनाने लाभार्थ्यांचे मुलभूत पात्रता शैक्षणिक निकष व इतर निकष विहित केलेले आहेत. त्यानुसार या योजनेंतर्गत सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षाकरीता प्रथम वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना, तृतीय वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांना व चतुर्थ वर्षात प्रवेश घेतलेल्या १५० विद्यार्थ्यांचे प्रती जिल्हा ६०० विद्यार्थ्यांना सद्यस्थितीत लाभ देण्याची प्रक्रिया सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, धाराशिव कार्यालयाकडे उच्च शिक्षणाचे द्वितीय,तृतीय व चतुर्थ वर्षासाठी २० जून ते १५ जुलै या कालावधीत अर्ज स्विकारले जातील. निवड यादी १ ऑगस्ट रोजी प्रसिध्द होईल. उच्च शिक्षणाचे प्रथम वर्षासाठी ५ ते २० ऑगस्ट या कालावधीत अर्ज स्विकारले जातील. त्याची निवड यादी २ सप्टेंबर रोजी प्रसिध्द करण्यात येईल. योजनेच्या विस्तृत अटी व शर्तीच्या माहितीसाठी संबंधित सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, धाराशिव या कार्यालयाकडे संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणचे सहाय्यक आयुक्त बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

## फळपिकांचे पक्षी व गारपिटीपासून संरक्षणासाठी जाळीसाठी शेतकऱ्यांनी अर्ज करावेत

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - एकात्मिक फलोत्पादन विकास योजनेतंर्गत फळपिकांचे पक्ष्यांपासून संरक्षण पक्षीरोधक जाळी व फळपिकांचे गारपिटीपासून संरक्षण करण्याकरिता गारपीटरोधक जाळी या घटकाचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी महा-डिबीटी पोर्टल https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांच्या नावे स्वतःची शेत जमीन असणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांकडे फलोत्पान पिके असणे आवश्यक आहे. जाळी व इतर घटकांचा खर्च ३५ रुपये प्रती चौ.मी.इतका अपेक्षित धरलेला असून त्यावर शेतकऱ्यांना ५० टक्के अनुदान देण्यात येणार आहे. अनुदान ५ हजार रुपये चौ.मी.पर्यंत प्रती लाभार्थी देण्यात येईल. जिल्ह्यातील सर्वसाधारण, अनुसुचित जाती व अनुसूचित जमाती व इतर प्रवर्गातील सर्व शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी महा-डिबीटी पोर्टल https://mahadbt.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर अर्ज करावेत, अधिक माहितीसाठी संबंधित नजीकच्या कृषी कार्यालयाशी संपर्क साधवा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे.

## पालकमंत्री डॉ सावंत यांच्या हस्ते छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे उद्घाटन

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे दि.२४ जून रोजी पालकमंत्री डॉ. तानाजी सावंत यांच्या हस्ते पुष्पक मंगल कार्यालय, धाराशिव येथे सकाळी १० वाजता उद्घाटन करण्यात येणार आहे. प्रमुख अतिथी म्हणून जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी व पोलीस अधीक्षक तसेच विविध कार्यालयाचे प्रमुख, शाळा कॉलेजचे प्राचार्य, शिक्षण तज्ञ व उद्योजक हे उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमात १० वी व १२ नंतर काय, भविष्यातील रोजगाराच्या संधी,व्यक्तिमत्व विकास ?, बायोडेटा तयार करणे, मुलाखतीची तयारी, नवीन तंत्रज्ञानावर आधारित प्रशिक्षण व रोजगाराच्या संधी याविषयी तसेच अनेक शैक्षणिक कर्ज उपलब्ध करून देणाऱ्या बँका, विविध महामंडळे, शासकीय योजनांची माहिती, कलमापन चाचणी, शैक्षणिक शिष्यवृत्ती योजना व कर्ज योजना यांची माहिती आणि करिअर प्रदर्शनी या विषयावर तज्ञ मार्गदर्शकांचे मार्गदर्शन होणार आहे. तसेच या ठिकाणी विविध नामांकित कंपन्यांच्या माध्यमातून बेरोजगार तरुणांसाठी रोजगार मेळाव्याचे देखील आयोजन केले आहे. इच्छूक उमेदवारांनी या मेळाव्यास व छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिरास सर्व युवक-युवती, महाविद्यालयीन व शालेय विद्यार्थ्यांनी तसेच पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी प्रवीण औताडे, प्रभारी सहाय्यक आयुक्त कौशल्य विकास संजय गुरव व प्राचार्य एम.एस. बिरादार यांनी केले आहे.

## १५ जुलैपर्यंत १ रुपयात पीक विमा नोंदणीसाठी मुदत

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - खरीप हंगामात नैसर्गिक आपत्ती, किड व रोगामुळे पिकांचे नुकसान झाल्यास शेतकऱ्यांना विमा संरक्षण देण्यासाठी प्रधानमंत्री पीक विमा योजने अंतर्गत ु. षिलू.र्सौं.ळप या पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने अर्ज नोंदणी सुरु आहे.

खरीप हंगामात पीक विम्याचा हप्ता भरण्याची अंतिम मुदत कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना १५ जुलै आहे. पीक विमा योजना ही कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक असून कर्जदार शेतकऱ्यांना योजनेत सहभाग घ्यावयाचा नसेल तर कर्ज घेतलेल्या अधिसुचित पिकांसाठी नोंदणीच्या अंतिम मुदतीच्या ७ दिवस आधीपर्यंत संबंधित बँकेस विमा हप्ता कपात न करणेबाबत घोषणा पत्र देणे आवश्यक आहे.

जे कर्जदार शेतकरी योजनेत सहभागी होण्याबाबत घोषणापत्र देणार नाहीत.त्या सर्व शेतकऱ्यांचा योजनेमध्ये सहभाग बंधनकारक समजला जाणार आहे. या योजने अंतर्गत शेतकऱ्यांनी भरावयाचा विमा हप्ता हा खरीप हंगामासाठी २ टक्के व नगदी पिकासाठी ५ टक्के असा मर्यादीत ठेवण्यात आला असला तरी सन २०२३-२४ पासून सर्वसमावेशक पिक विमा योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. या योजनेमध्ये शेतकऱ्यांनी प्रती अर्ज केवळ १ रुपया भरुन पीक विमा पोर्टलवर नोंदणी करावयाची आहे. शेतकरी हिस्यातील उर्वरीत पिक विमा हप्त्याची रक्कम राज्य शासन भरणार आहे.ज्या शेतकऱ्यांनी पेरणी केली आहे किंवा पेरणी करावयाची आहे. अशा शेतकऱ्यांनी शासन निर्णयानुसार एक रुपयात विमा अर्ज सादर करावेत. ज्या पिकाचा विमा उतरावयाचा आहे, ते पीक शेतात पेरल्याबद्दलचे स्वयंघोषणा पत्र, सात बारा व ८ अ चा उतारा, आधार कार्ड, बँक पास बुकच्या झेरॉक्स प्रतिसह नजिकच्या आपले सरकार सेवा केंद्र, कॉमन सर्विस सेंटरमधून बँकेमधून किंवा शेतकऱ्याकडे स्वत: ची सोय असल्यास स्वत: पीक विमा पोर्टलवर ऑनलाईन पध्दतीने विमा हप्ता भरुन पीक संरक्षित करावे. त्यामुळे शेतकऱ्यांनी अंतिम मुदतीची वाट न पाहता आत्ताच पिक विमा योजनेत सहभाग नोंदवावा.असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे.

## पशुपालकांनी तात्काळ वैरण बियाण्यांची पेरणी करावी

### वैरण बियाण्यांचे लाभार्थ्यांना वाटप

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात सन २०२३ मध्ये पर्जन्यकाळात ८९.५ टक्के पाऊस झाला आहे. सरासरीपेक्षा कमी झालेल्या पावसामुळे कृषी पिकावर विपरीत परिणाम होवुन उन्हाळी हंगामातील कृषि पिकांच्या पेरणीमध्ये घट होण्याची शक्यता आहे. यामुळे राज्यातील पशुधनास जुन ते ऑगस्ट या कालावधीत आवश्यक चारा उत्पादीत होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने पशुसंवर्धन विभाग जिल्हा परिषद अंतर्गत सन २०२४-२५ या वर्षात जिल्हा वार्षिक योजना दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम (वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम) या योजनेअंतर्गत वैरण बियाणे वाटपासाठी जिल्हयासाठी १०० लाख रुपये नियतव्यय मंजुर करण्यात आला आहे.

जिल्ह्यामध्ये दुष्काळ जाहीर झालेला असुन जनावरांना चारा उपलब्धतेसाठी व पुढील कालावधीत चारा मिळण्यासाठी सध्या चांगला पाऊस पडत असल्याने व पेरणीची वेळ आल्याने पशुसंवर्धन विभागाकडून दुभत्या जनावरांना खाद्य उपलब्धतेसाठी सुधारणा कार्यक्रम (वैरण व पशुखाद्य विकास कार्यक्रम) या योजनेमध्ये निवड करण्यात आलेल्या पशुपालकांना जनावरांच्या चा-यासाठी नियतव्ययामधुन १०० टक्के अनुदानावर जिल्हयातील एकुण ५ हजार ४९३ पशुपालकांना ३५ हजार ८४० किलो सुधारीत संकरित मका या वैरण बियाणाचे वाटप करण्यात आले आहे. योजनेमध्ये निवड करण्यात आलेल्या धाराशिव तालुक्यातील पशुपालकांला १४ जून रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे हस्ते त्यांच्या दालनात सुधारीत संकरित मका या वैरण बियाणाचे वाटप करण्यात आले.

या योजनेमधील निवड करण्यात आलेल्या पशुपालकांनी तात्काळ बियाणेची पेरणी करुन जनावरांच्या चाऱ्याचे उत्पादन घेवून चाऱ्याचा प्रश्न सोडवण्यात यावा.असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त व जिल्हा परिषदेचे जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी केले.

## शेतकऱ्यांनी कृषी निविष्ठांसाठी ३० जूनपर्यंत अर्ज करावेत

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) - सोयाबीन व इतर तेलबिया आधारित पीक पध्दतीस चालना देवून शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करुन सोयाबीन व इतर तेलबिया पिकातील मूल्यसाखळीस चालना देणे या उद्देशाने राज्य पुरस्कृत एकात्मिक सोयाबीन आणि इतर तेलबिया उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकासासाठी विशेष कृती योजना सन २०२२-२३ ते २०२३-२४ या तीन वर्षात राबविण्यात येत आहे.सन २०२४-२५ मध्ये योजनेंतर्गत चालू खरीप हंगामामध्ये पुढील निविष्ठा पुरविण्यात येणार आहेत.

नॅनो युरिया सोयाबीन, नॅनो डीएपी सोयाबीन मिळण्यासाठी १८ ते ३० जूनपर्यंत अर्ज करावे. मेटाल्डीहाइड सोयाबीन मिळण्यासाठी मुदत १८ ते २३ जून आहे. या निविष्ठांचा पुरवठा करण्याकरिता लाभार्थ्यांची निवड महाडीबीटी पोर्टलवर केलेल्या ऑनलाईन अर्जातून ऑनलाईन पद्धतीने निवड करण्यात येणार आहे. त्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर १२ जूनपासून या बाबींच्या टाईल्स उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. बियाणे, औषधे व खते या टाईल अंतर्गत शेतकऱ्यांना अर्ज करता येतील. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी mahadbt.maharashtra.gov.in - farmer login या वेबसाईटवर ऑनलाईन अर्ज करून या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# विचारपीठ

## विश्वकर्मांना बळ देण्यासाठी

गेल्या ७५ वर्षांमध्ये ग्रामीण भागाला दिशा देणारा, सामर्थ्य देणारा एकही कार्यक्रम आखला गेला नव्हता; परंतु ही उणीव पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान ही योजना आणून दूर केली गेली. स्थानिक कलाकुसरीच्या निर्मितीमध्ये लहान कारागीर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात, हे पंतप्रधान मोदी यांच्या लक्षात आल्यामुळेच त्यांनी पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा पाया घातला आहे. याविषयी यंदाच्या अर्थसंकल्पात पंतप्रधान विश्वकर्मा योजनेच्या घोषणेने सर्वांचे लक्ष वेधले होते; परंतु माध्यमांमध्ये त्याविषयी फारशी चर्चा न झाल्यामुळे तो विषय समजायला हवा, त्यांच्यापर्यंत पोहोचला नाही हे सत्य आहे. उदाहरणार्थ, भरडधान्याचा विषय हाताळला गेल्यामुळे लोकांपर्यंत गेला. तसाच हादेखील एक चांगला आणि नोंद घेण्याजोगा विषय असून यामध्ये कारागीर आणि छोट्या व्यवसायाशी निगडित लोकांना प्रोत्साहन देणे हे पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचे उद्दिष्ट आहे.

१८६० मध्ये मार्क्सने ङ्कॅपिटलफ नावाचा ग्रंथ लिहिला. त्यामध्ये भारत हा सुमारे साडेसहा लाख स्वतंत्र राज्यांचा देश आहे, असे वर्णन त्याने केलेले आहे. याचा अर्थ भारतातील साडेसहा लाख खेडी स्वतंत्र राज्यांप्रमाणे वागत होती आणि त्यामुळेच भारतामध्ये सुवर्णकाळ निर्माण झाला होता, असे प्रतिपादन केलेले आहे. त्याच्या खोलात गेले असता आपल्याकडील बारा बलितेदारी हा खेड्याच्या विकासाचा पाया असल्याचे दिसून येते. इंग्रज राज्यकर्त्यांनी हा पाया मोडून काढला कारण त्यांना येथील बाजारपेठ आपल्या उत्पादनासाठी काबीज करायची होती. लोकमान्य टिळकांपासून महात्मा गांधींपर्यंत त्यावेळच्या बहुतांश नेत्यांनी इंग्रजांचा हा डाव ओळखून उपाययोजना करण्याचे प्रामाणिक प्रयत्न केले. लोकमान्य टिळकांनी स्वदेशीचा नारा दिला तर महात्मा गांधींनी चरखा चालवून मॅचेस्टरवरून येणाऱ्या वस्त्रउद्योगाला विरोध दर्शवण्याचा प्रयत्न केला. यापलीकडे जाऊन सरदार वल्लभभाई पटेल यांनी ब्रिटिशांची दूधधंद्यावरील मक्तेदारी मोडून काढण्यासाठी सहकारी दुग्धव्यवसाय निर्माण केला, त्याला कोरियनसारख्या तज्ज्ञांनी पाठबळ दिल्यामुळे आज जगामध्ये भारत दूध निर्माण करणारा आणि प्रक्रिया करणारा क्रमांक एकचा देश ठरलेला आहे.

गेल्या ७५ वर्षांमध्ये ग्रामीण भागाला दिशा देणारा, सामर्थ्य देणारा एकही कार्यक्रम आखला गेला नव्हता; परंतु ही उणीव पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पीएम विश्वकर्मा कौशल्य सन्मान ही योजना निर्माण करून दूर केली आहे. स्थानिक कलाकुसरीच्या निर्मितीमध्ये लहान कारागीर अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतात, हे पंतप्रधान मोदी यांच्या लक्षात आल्यामुळे त्यांनी देशाच्या अमृत महोत्सवी वर्षामध्ये तळागाळातील उपेक्षित छोट्या कारागिरांना सक्षम करण्यासाठी पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा पाया घातला आहे. पारंपरिक बारा बलितेदारीतील कारागीर आणि देशामध्ये शिल्प निर्माण करणाऱ्या समृद्ध परंपरा जपत त्यांचा विकास करणे हा पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा उद्देश आहे. विश्वकर्माबद्दल भारतातील सामान्य माणसाला अगदी कमी माहिती आहे. आज पाश्चिमात्य देशात उठावदार इमारती आणि शिल्प दिसतात त्यामागे तेथील शिल्पकारांचा फार मोठा वाटा आहे. युरोप, अमेरिका आणि इतर प्रगतिशील देशांमधील शिल्पकला तसेच इतर कला गेल्या हजार वर्षांच्या काळात कशा विकसित झाल्या हे जाणून घ्यायचे असेल, तर अच्युत गोडबोले आणि दीपा देशमुख यांचे सुमारे हजार पानांचे ङ्कॅन्व्हासफ हे पुस्तक वाचायला हवे. त्याचप्रमाणे त्यांनीच लिहिलेले ङ्किमयागारफ या पुस्तकात लहान माणसे देशाच्या विकासात किती महत्त्वाची भूमिका बजावतात याची शेकडो उदाहरणे दिलेली आहेत.

कुशल कारागीर आत्मनिर्भर भारताच्या खऱ्या भावनेचे प्रतीक आहेत. पूर्वी महर्षी विश्वकर्मा यांनी पांडवांसाठी मायानगरी निर्माण केली होती. याचे वर्णन महाभारतात आहे. म्हणूनच या योजनेला ङ्कविश्वकर्माफ असे नाव दिले आहे. महर्षी विश्वकर्मा यांनी एकच चमत्कार केला नसून भारतीय स्थापत्य आणि शिल्पकला त्यांनी एवढी समृद्ध केली होती की, त्याचे वर्णन वाचून आजही आश्चर्य वाटल्याखेरीज राहात नाही. हे तत्त्व लक्षात ठेवून पंतप्रधान मोदी यांनी भारताच्या विकासाच्या प्रवासात वेगळी दिशा निर्माण करून गावागावातील प्रत्येक घटकाला विकासासाठी सक्षम करण्याचा विडा उचलला आहे. यासाठी कौशल्य असणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या गरजांनुसार कौशल्यात वाढ करण्यासाठी केवळ घोषणा करून जमणार नाही, तर त्यांना पायाभूत सुविधांची पूनर्रचना करून देणेही आवश्यक आहे, याचा विचार या योजनेमध्ये केलेला आहे. पंतप्रधानांचे असे मत आहे की, आजचे लहान-सहान परंपरागत ङ्कविश्वकर्माफ उद्याचे उद्योजक होऊ शकतात. कौशल्यपूर्ण कारागीर आणि शिल्पकार मूल्यसाखळीचा एक भाग होतात तेव्हाच त्यांना बळकट केले जाऊ शकते.

ही योजना भारतीयांच्या नैपुण्याला आणि कौशल्याला समर्पित आहे. कौशल्य भारत अभियान आणि कौशल्य रोजगार केंद्राच्या माध्यमातून कोट्यवधी तरुणांसाठी कौशल्य आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्याचे या योजनेचे लक्ष्य आणि वैशिष्ट आहे. भारतीय परंपरेत महर्षी विश्वकर्मा यांनी उच्च कोटीचे स्थान निर्माण केले होते. त्यामध्ये नवीन अवजारांचा शोध आणि मदत याच्या सहाय्याने हाताने काम करण्याबद्दलची आदराची आणि सन्मानाची परंपरा निर्माण करण्याचा भाग मोठा होता. सुतार, लोहार, गवंडी, शिल्पकार, चांभार आणि इतर खेडेगावातील सर्व गरजा पूर्ण करणारे कौशल्ययुक्त लोक आजही शेतकरी समाजाचे आणि ग्रामीण भागाचे अविभाज्य भाग आहेत. मात्र आता त्यांची कला लोप पावत आहे. कारण गेल्या ७५ वर्षांत ते दुर्लक्षितच राहिले आहेत.

मात्र देशाच्या सुवर्णयुगामध्ये तरी स्थानिक हस्तकलांवर आधारित वस्तूंच्या उत्पादनासाठी छोट्या कारागीरांना सक्षम करणे अत्यंत गरजेचे आहे. यामुळे निर्यातीला आवश्यक असणाऱ्या गोष्टीदेखील खेड्यातील कुशल कारागीर आपापल्या पद्धतीने आणि आपापल्या क्षमतेनुसार भर घालून करू शकेल. ही बाब देशाला पुन्हा एकदा गतकाळातील सुवर्णवैभव मिळवून देऊ शकेल. हे स्वप्न साकारण्यासाठी या कलाकारांना आर्थिक बळ देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. बँकांमार्फत कमी व्याजदराने आवश्यक ती रक्कम प्रकल्पयोजना सादर करून आणि त्याला संमती मिळवून मिळवता येईल. देशातील यंत्रसामग्रीवर संशोधन करणाऱ्या संस्थांना या कलाकारांना पुरक ठरतील अशी यंत्रे निर्माण करण्यासाठी मदत करण्याची तरतूद या योजनेमध्ये आहे. केवळ हातानेच नव्हे तर छोट्या यंत्रांच्या सहाय्याने गावखेडी तसेच शहरांमध्ये वास्तव्य करून हस्तकलेच्या आधारे गुजराण करणाऱ्या कारागिरांना या योजनेमुळे दिलासा मिळेलच खेरीज त्यांच्या वस्तू भारत आणि भारताबाहेर विकण्याची यंत्रणादेखील या योजनेअंतर्गत निर्माण केली आहे. त्यामुळे त्या अर्थानेही ही योजना परिपूर्ण आहे, असे म्हणावे लागेल. सरकार कोणत्याही बँक हमीशिवाय कोट्यवधी रुपयांचे कर्ज मुद्रायोजनेच्या सहाय्याने या कलाकारांपर्यंत पोहोचवणार आहे. विश्वकर्मा मंडळींना डिजिटल साक्षर करण्यासाठी या योजनेमध्ये प्राधान्याने मोहीम राबवण्याची तरतूदही केली गेली आहे. पंतप्रधान मोदींचा विश्वास आहे की, प्रत्येक विश्वकर्म्याला सरकार समग्र संस्थात्मक पाठबळ पुरवेलच; परंतु कारागिरांना सोपी, सुरळीत कर्जप्रक्रिया, कौशल्यविकास प्रशिक्षण, तांत्रिक पाठबळ, डिजिटल सक्षमीकरण, आपल्या उत्पादनाचा प्रचार आणि प्रसार, विपणन आणि कच्च्या मालाचा पुरवठा या सुविधा खात्रीने मिळवून देण्याची या योजनेत तरतूद आहे. या योजनेचे लक्ष्य केवळ स्थानिक बाजारपेठेचे नसून जागतिक बाजारपेठही नजरेच्या टप्प्यात असल्यामुळे चीनसारखे जगातील ग्राहकांची गरज लक्षात घेण्यावर या योजनेमध्ये भर दिला गेला आहे. या योजनेचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आपल्याच पक्षाच्या कार्यकर्त्यांनी नव्हे तर सर्व प्रचारमाध्यमांनी कारागिरांपर्यंत ही योजना नेण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पंतप्रधानांनी दोन वेळा केले आहे. सुरुवातीला अर्थसंकल्पाच्या वेळी आणि दुसऱ्यांदा नवीन संसदेच्या उद्घाटनाच्या वेळी पंतप्रधानांनी यासंबंधी वक्तव्य केले आहे. सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगक्षेत्रासाठी पुरवठादार आणि उत्पादन यांना अधिकाऱ्यांकडून साधने आणि तंत्रज्ञान कसे मिळवून देता येईल यासंबंधीचा बारीक सारीक तपशील या योजनेमध्ये बघायला मिळतो. बँकांसह सर्व घटकांनी तळागाळातील कलाकारांना हवी ती मदत सन्मानाने मिळवून देण्याची भूमिका घेतली असून त्यांच्यामध्ये चांगला समन्वयही दिसून येत आहे. आता प्रत्येक कौशल्यधारी माणसाने याचा लाभ घ्यायला हवा. स्टार्टअप परिसंस्था, उत्तम तंत्रज्ञान, आलेखन, पॅकेजिंग आणि वित्तपुरवठा यांसह ई-कॉमर्स मॉडेलद्वारे हस्तकला उत्पादनासाठी देशात आणि परदेशात मोठी बाजारपेठ निर्माण केली जाणार आहे. चीनने अशा योजनेद्वारे कमी किमतीत वस्तूनिर्मिती करून जगाची बाजारपेठ काबीज केली आहे. त्या दिशेने टाकले हे आपल्या देशाचे पाऊल आहे.

## आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव!

आषाढ महिना सुरू झाला की वेध लागतात ते पंढरीच्या वारीचे. लाखो वारकरी देहू आणि आळंदीत जमा होतात. डोईवर तुळशी वृंदावन व विठ्ठल रखुमाईच्या मूर्ती हाती टाळ मृदंग, मुखी विठ्ठल, विठ्ठल जयहरी विठ्ठलचा गजर करीत, ज्ञानोबा - तुकारामांचा जयघोष करीत व खांद्यावर भागवत धर्माची भगवी पताका फडकवीत विठुरायाच्या भेटीसाठी लाखो वैष्णवांचा मेळा निघतो हे दृश्य डोळ्यांचे पारणे फेडणारे असते. आषाढी वारी म्हणजे महाराष्ट्राचा लोकोत्सव! पालखी सोहळा हे महाराष्ट्राचे वैभव आहे. १३ व्या शतकात ही परंपरा असल्याचे उल्लेख सापडतात. संतश्रेष्ठ ज्ञानोबा माऊलींच्या घराण्यात पंढरीच्या वारीची परंपरा होती. त्यांचे वडील वारीला जात असल्याचा उल्लेख आढळतो. ज्ञानदेवांनी भागवत धर्माची पताका खांद्यावर घेऊन सर्व जातीपातीच्या समाजाला एकत्रितपणे या सोहळ्यात सामील करुन घेतले. हेच व्यापक स्वरूप जपत एकनाथ महाराज तुकाराम महाराज यासारख्या संतांनी वारीची परंपरा पुढे चालवली. गेली कित्येक वर्षे सुरू असलेली ही महाराष्ट्राची परंपरा आता देशातच नाही तर विश्वात लोकप्रिय झाली आहे. संपूर्ण महाराष्ट्रातून वारकरी व भाविक वारीमध्ये सहभागी होतात. महाराष्ट्रातूनच नव्हे तर गुजरात, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा या राज्यातूनही लोक वारीमध्ये सहभागी होतात. आतातर परदेशातूनही लोक खास वारी अनुभवण्यासाठी महाराष्ट्रात येतात. दिवसेंदिवस वारीतील वारकऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. १९६५ च्या सुमारास आळंदीच्या पालखीमध्ये पाच हजार वारकरी सहभागी झाल्याचा उल्लेख दि ब मोकाशी यांच्या पुस्तकात आढळतो. आज ती संख्या लाखोंच्या घरात पोहचली आहे. वृद्धांप्रमाणे तरुणही आता वारीत सहभागी होत आहेत. सहकुटूंब वारी करणाऱ्यांची संख्याही वाढली आहे. कुठलीही जाहिरात न करता, मार्केटिंग न करता लाखो भाविक वारीत सहभागी होतात. वारी म्हणजे नियोजनाचे सर्वोत्तम उदाहरण! मार्च महिन्यातच दिंडीचे नियोजन होते. दिंडीतील सहभागी वारकरी, आचारी, शिधा, मुक्कामाची सोय याचे सर्व नियोजन मार्च महिन्यातच होते. मार्च महिन्यात सुरू झालेले हे दिंडीचे नियोजन दिंडी पुन्हा गावी परत येण्यापर्यंतचे असते. वारीतील शिस्त तर काय वर्णवावी! कोठेही गडबड गोंधळ नसतो. स्वयंशिस्तीने चालणाऱ्या वारकऱ्यांना आस असते ती केवळ विठुरायाच्या भेटीची ! लाखो वारकरी एकत्रित असूनही त्यांच्यातील शिस्त कधी बिघडत नाही. त्यांची शिस्त समाजाला दिशा देणारीच असते. पालखी मार्गावर पालख्यांचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक उभे असतात. साधू संत येती घरा.... तोचि दिवाळी दसरा..... ! ही भावना त्यामागे असते. अनेक सेवाभावी संस्था दिंडीतील वारकाऱ्यांसाठी फराळ व आहाराचे वाटप करतात. शासन स्तरावरुन देखील पालख्यांचे योग्य नियोजन केले जाते. पिण्याच्या पाण्याची व मुक्कामाची योग्य सोय केली जाते. वारी दरम्यान गृह विभागाकडून चोख सुरक्षा व्यवस्था पुरवली जाते. आरोग्य विभाग वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी तत्पर असते. तज्ज्ञ डॉक्टरांचे पथक कायम वारकऱ्यांच्या सेवेसाठी उपलब्ध असते. आतातर नेटकरी नेटवरही वारीचे अपडेट देत असतात. फेसबुक, ट्विटर सारख्या सोशल मीडियावर देखील आता वारीचा अमूभव घेता येतो. त्यामुळे वारीदेखील आता ग्लोबल झाली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## कापूर – छोट्या मोठ्या आजारात प्रभावी औषध

कापूर हा विशिष्ट झाडांपासून बनविला जाणारा सुगंधी पदार्थ घरात, मंदिरात पूजा करताना आवर्जून वापरला जातो. देवाची कापूर आरती करण्याची प्रथा भारतात सर्वत्र आहे. हा कापूर आयुर्वेदात एक घरगुती औषधी म्हणून महत्वाचा मानला गेला असून त्याचे अनेक उपयोग आहेत. इतकेच नव्हे तर त्वचा, केस, स्नायू यांचे अनेक विकार त्याने दूर करता येतात. कापूर आणि त्याचे तेल यांचा वापर अनेक औषधे बनविताना केला जातो. त्यापासून अनेक मलमे बनविली जातात. पोटदुखी असेल तर एक ग्लास पाण्यात १ चमचा ओवा घालून ते पाणी उकळवून अर्धे झाले कि त्यात थोडा कापूर घालून प्यायल्याने दुखण्याला उतार पडतो. सांधेदुखित कापूर तेलाचे मालिश केल्यास बरे वाटते तसेच खाज, इन्फेक्शन यावर खोबरेल तेलात कापूर घालून चोळण्याने आराम पडतो. भाजले असेल तर त्या ठिकाणी कापूर तेल लावल्यास जळजळ थांबते आणि संसर्ग होत नाही. इतकेच नव्हे तर घरात कापूर जाळला तरी घरातील जंतू नष्ट होतात.
तोंडावर मुरमे, पुटकुळ्या येत असतील तर खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण त्वचेवर चोळल्यास डाग राहत नाहीत. कोमट पाण्यात कापूर आणि थोडे मीठ घालून पाय बुडवून बसले तर टाचेच्या भेगा कमी होतात. ओलिव्ह तेलात कापूर घालून त्याने डोक्याला मसाज केल्यास स्ट्रेस, डोकेदुखी थांबते. दातदुखी असेल तर कापूर पावडर दातात धरली तर दात दुखायचा थांबतो.सर्दी खोकला झाल्यास खोबरेल तेल आणि कापूर यांचे मिश्रण छाती, डोक्यावर चोळावे. आराम पडतो. जुलाब होत असतील तर ओवा, कापूर आणि पेपरमिंट समप्रमाणात घेऊन काचेच्या बरणीत उन्हात ठेवावे. ६ -८ तासानंतर मिश्रणाचे ४-५ थेंब टाकून सरबत घ्यावे.
रात्री झोपण्यापूर्वी कच्चे दुध आणि कापूर पावडर कापसाने चेहऱ्यावर लावावी आणि १५ मिनिटाने धुवावे. त्वचा चमकदार आणि हेल्दी होते. कापले किंवा कोणत्याची कारणाने जखम झाली तर कापूर मिश्रित पाणी लावावे. तोंड आल्यास शुद्ध तुपात कापूर घालून सेवन केल्यास उतार पडतो.पर्यटन अथवा ट्रेकिंग साठी अधिक उंचीच्या ठिकाणी गेल्यास अनेकदा श्वास घ्यायला त्रास होतो, चक्कर येते अश्यावेळी कापूर नुसता हुंगला तरी आराम पडतो.

## कच्चा आंबा खाण्याचे हे जबरदस्त फायदे

आपल्या आहारात कच्चा आंबा किंवा कच्ची कैरी समाविष्ट केल्याने आरोग्याविषयी फायदे मिळतात जाणून घेऊ या कच्चा आंबा खाल्ल्याने पोटाला आराम मिळतो जर आपल्याला बद्धकोष्ठतेचा त्रास आहे तर हे पोटासाठी फायदेशीर आहे. गरोदरपणात देखील मळमळत असल्यास ह्याचे सेवन केल्याने आराम मिळतो. पचन व्यवस्था सुरळीत होते. त्वचेला आणि केसांना देखील याचा फायदा होतो या मध्ये व्हिटॅमिन ए आणि व्हिटॅमिन सी मुबलक प्रमाणात आढळते. हे शरीरातील विषारी टॉक्सिन काढतो याचा नियमित सेवन केल्याने त्वचा आणि केसांमध्ये चमक येते. कच्चा आंबा हा हृदयासाठी फायदेशीर ठरतो या मध्ये व्हिटॅमिन बी ३ आढळते याला मायसिन देखील म्हणतात. हे हृदयरोगाच्या



समस्येला दूर करतो. ज्यांना हृदयविकाराचा त्रास आहे त्यांनी दररोज कैरी चे सेवन करावे.यामुळे दात देखील बळकट होतात. या मध्ये कॅल्शियम जास्त प्रमाणात आढळते जे दातांना बळकट करण्याचे काम करतो. दातात चमक येते. दातांना बळकट करण्यासाठी दररोज कैरी चावून खावी.

## उन्हाळ्यात तुम्ही निरोगी राहण्यासाठी काय कराल ?



उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत आहे.या उष्ण व कोरड्या ऋतूत प्रकृतीची काळजी घेणे गरजेचे असते. अन्यथा,उन्हाचा त्रास होऊन उष्माघातासारखी गंभीर घटनाही होऊ शकते. त्यामुळेच,वाढत्या तापमानाचा सामना करणे गरजेचे असते. उन्हाळ्यात निरामय आरोग्यासाठी उन्हाळ्यात शरीराला पाण्याची गरज इतर कोणत्याही ऋतूंपेक्षा अधिक असते.त्यामुळे दिवसभरात किमान आठ ते दहा ग्लास पाणी प्यावे.
दिवसभरातून पाण्याबरोबरच लिंबू सरबत,ताक,लस्सी,नीरा,शहाळे आदी द्रव पदार्थांचे प्रमाणही वाढवावे.त्यातून शरीराला पाण्याव्यतिरिक्त आवश्यक असणारे घटकही मिळू शकतात.
उन्हाळ्यात कलिंगड,खरबूज,द्राक्षे आदी रसदार फळे खावीत. कलिंगडामध्ये पाणी आणि कॅल्शिअमचे प्रमाण अधिक असते.खरबूजामध्ये अ,क जीवनसत्त्वे,लोह,सोडिअम,पोटॅशिअम असते. उन्हाळ्यात पचनशक्ती कमी झालेली असते. त्यामुळे,पचायला हलका आहार घ्यावा.त्याचप्रमाणे,उष्ण व कोरड्या ऋतूचा त्रास टाळण्यासाठी मांसाहार,तिखट व मसालेदार पदार्थही टाळावेत.तसेच चहा,कॉफीबरोबरच मद्यसेवनही टाळावे.उन्हातून आल्यावर लगेच पाणी पिऊ नये.साधारनपणे दहा मिनिटे शांत बसल्यावर सावकाश घोटघोप पाणी प्यावे.माठातील नैसर्गिकरीत्या झालेले थंड पाणी प्यावे.

## तूमच्या आवडीची कॉफी सांगते तुमच्या व्यक्तिमत्वाबद्दल बरेच काही

तुम्हाला आवडणारा कॉफीचा प्रकार, तुमच्या व्यक्तिमत्वाबद्दल बरेच काही सांगून जातो. त्यामुळे आता कधी मित्रमैत्रिणींसोबत कॉफी प्यायला बाहेर गेलात, तर ते कशा प्रकारची कॉफी घेणे पसंत करतात, हे पाहून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलू तुमच्या लक्षात येतील. आजकाल कॉफीचे अनेक प्रकार लोकप्रिय आहेत. कोणाला लाटे आवडते, तर कोणाला एस्प्रेसो, कोणाला मोका आवडते, तर कोणाला कॅपुचिनो..त्यामुळे जसे कॉफीचे प्रकार निरनिराळे, तसेच त्यांच्याशी निगडीत असणारी व्यक्तिमत्वे देखील निरनिराळी.. त्यामुळे पुढच्या वेळी कॉफी घेताना ही तथ्ये केवळ मनोरंजन म्हणून पडताळून पाहायला काहीच हरकत नाही. जर एखाद्या व्यक्तीला एस्प्रेसो हा कॉफीचा प्रकार आवडत असेल, तर ती व्यक्ती काहीशी लहरी, किंवा मूडी असते. त्याच्याशी निगडीत प्रत्येक वस्तु वर त्यांचे नियंत्रण असणे त्यांना पसंत असते. अश्या व्यक्ती नेहमी भविष्याचा विचार करतात. या व्यक्ती सर्व कामे वेळशीर होण्याबद्दल आग्रही असतात. कोणत्याही प्रकारची असफलता, किंवा अकार्यक्षमता या व्यक्तींना अजिबात पसंत नसते. या व्यक्ती लहरी स्वभावाच्या असल्याने यांना समजून घेणे काहीसे कठीण जरी असले, तरी या व्यक्ती अतिशय उत्तम सहकारी, मित्र आणि विश्वासू जोडीदार ठरतात. या व्यक्तींना यांच्या खासगी आयुष्यात कोणी लुडबुड केलेली अजिबात आवडत नाही, पण या व्यक्ती माणूसघाण्या देखील नाहीत. मैत्री करणे यांना आवडते.जर एखाद्या व्यक्तीला कॅपुचीनो आवडत असेल, तर ती व्यक्ती अतिशय एक्स्ट्रोव्हर्ट, म्हणजेच सर्वांशी अतिशय मनमोकळेपणाने वागणारी, आणि आशावादी असते. या व्यक्ती अतिशय हॅपी गो लकी असून त्यांचे विचार आणि सहवास, वातावरण सकारात्मक करणारे असतात. या व्यक्तींना नवनवे प्रयोग करून बघण्यास आवडते, पण ह्या व्यक्ती चंगळवादी नाहीत, म्हणजेच सुट्टीच्या दिवशी एखाद्या महागड्या मॉलमध्ये जाऊन खरेदी, जेवण असल्या गोष्टी टाळन या व्यक्ती घरीच बसून टीव्हीवर आपला आवडता कार्यक्रम किंवा चित्रपट पाहणे पसंत करतात. या व्यक्तींना इतरांशी मैत्री करणे आवडत असले, तरी आपल्या खासगी बाबींपासून आपल्या मित्रमंडळींना लांब ठेवणे पसंत करतात. कामाच्या बाबतीतही या व्यक्ती अतिशय नीटनेटक्या असतात.
जर एखाद्या व्यक्तीला लाटे आवडत असेल, तर अशी व्यक्ती अतिशय स्टायलिश, फॅशन बद्दल जागरूक असणारी असते. बदलत्या फॅशन आणि ब्युटी ट्रेंड्स कडे या व्यक्तींचे बारकाईने लक्ष असते. वर्तामानपत्रातील इतर बातम्या पाहण्याआधी पेज थ्री वाचून काढायला यांना आवडते. या व्यक्ती अतिशय उत्साही असून, नेहमी चांगले दिसण्याबद्दल या आग्रही असतात. आपल्या मनमोकळ्या स्वभावामुळे या व्यक्ती इतरांना स्वतःकडे चटकन आकृष्ट करून घेतात. यांना गप्पा मारणे आवडते, आणि वाद-विवादाचा प्रसंग आलाच, तरी ही या व्यक्ती अजिबात मागे हटत नाहीत.एखाद्या व्यक्तीला जर मोका आवडत असेल, तर ती व्यक्ती स्वभावाने मृदू असते. यांच्यामध्ये नेहमीच उत्साह दिसून येतो. या व्यक्ती स्वभावाने अतिशय मृदू असल्या तरी हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एकाच पैलू आहे. या व्यक्ती अतिशय खंबीर आणि आपल्या निश्चायांवर ठाम असणाऱ्या असतात. परिस्थिती कितीही बिकट असली, तरी या व्यक्ती अजिबात घाबरून जात नाहीत. पएखाद्यावर मनापासून प्रेम करण्याची कल्पना यांना आवडते, पण कमिटमेंट करतना या व्यक्ती शंभर वेळा विचार करणाऱ्या असतात. या व्यक्तींची इच्छाशक्ती अतिशय बळकट असल्याने यांना जे हवे ते मिळविण्यासाठी ह्या व्यक्ती पडतील तेवढे कष्ट घेण्यास तयार असतात. या व्यक्ती व्यवहाराला अतिशय चतुर असतात. याच चतुरतेने इतरांकडून कामे करवून घेणे त्यांना चांगले अवगत असते.

## तांब्याच्या भांड्यातील पाणी पिण्याचे फायदे


पाणी तांब्याच्या पेल्यात प्यायल्यास अरोग्यास त्यास फायदा होतो. काही वर्षापूर्वी सर्वांच्याच घरी तांब्याची भांडी असायची. मात्र कालांतराने काचेची,स्टील ची भांडी वापरण्यास सुरुवात झाली. तांब्यांच्या भांड्यांची अनेक वैशिष्ट्ये आहेत.तांब्याच्या पिण्याचा आरोग्यावर चांगला परिणाम होतो. यामुळे शरीरातील तांब्याची कमतरता भरुन निघते. तसंच रोग पसरवणाऱ्या जिवाणूंपासून शरीर सुरक्षित ठेवतं. तांब्यात अँटी-इन्फ्लेमेटरी गुण असतात ज्यामुळे शरीराला वेदना, वात आणि सूज येत नाही. संधिवात असल्यास तांब्याच्या भांड्यातून पाणी प्यायल्याने फायदा होतो.तांब्याच्या भांड्यात ठेवलेलं पाणी शुद्ध मानलं जातं. हे पाणी जुलाब, कावीळ, अतिसार यांसारखे अनेक आजार पसरवणाऱ्या जिवाणूंना नष्ट करतं.पोटाच्या सर्व प्रकारच्या तक्रारींसाठी तांब्याचं पाणी अतिशय उपयोगी असतं. दररोज हे पाणी प्यायल्यास पोटदुखी, गॅस,ॲसिडिटी आणि बद्धकोष्ठता यांसारख्या समस्यांवर आराम मिळतो. अमेरिकन कॅन्सर सोसायटीनुसार, कॅन्सरची



सुरुवात रोखण्यास तांबे फायदेशीर आहे. यामध्ये कॅन्सरविरोधी घटक असतात.तांब्याच्या भांड्यात ठेवलेलं पाणी प्यायल्याने त्वचेवर कोणत्याही प्रकारची समस्या होत नाही. या पाण्यामुळे फोड्या, तारुण्यापीटिका तसंच त्वचेसंदर्भातील रोग होत नाहीत. तसंच त्वचा साफ आणि चमकदार होते.शरीराच्या अंतर्गत सफाईसाठी तांब्याचं पाणी फायदेशीर आहे. याशिवाय हे पाणी यकृत आणि किडनी निरोगी ठेवतो. कोणत्याही प्रकारच्या इन्फेक्शनपासून बचावासाठी तांब्याच्या भांड्यात पाणी ठेवणं लाभदायक असतं.

## कलिंगड खाल्ल्यानंतर लगेचच पाणी पिऊ नये, तुम्हाला हे माहिती काय? जाणून घ्या

मुंबई कोकमचे सरबत उन्हाळ्यात पिण्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. उन्हाळ्यात लिंबू सरबतासोबत कोकमच्या सरबतालाही अधिक पसंती दिली जाते. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. उन्हाळ्याच्या दिवसांत सतत तहान लागत असते. यावेळी अनेकांना कोल्ड्रिंक पिण्याचा मोह आवरत नाही. उन्हाळ्यात आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेणे अतिशय आवश्यक असते. शरीरामध्ये पाण्याची कमी झाल्यानंतर आपल्याला अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे आपण उन्हाळ्यात चांगल्या आहारावर जास्त भर देतो. त्यामध्ये उन्हाळ्यात आपण जास्त करून कलिंगड खाण्यावर भर देतो. कारण कलिंगडमध्ये अँटिऑक्सिडेंट्स, जीवनसत्त्वे बी,



सी आणि डी मोठ्या प्रमाणात आढळतात. जे उन्हाळ्यात शरीरासाठी खूप महत्वाचे मानले जातात. मात्र, तुम्हाला हे माहिती काय? की, कलिंगड खाल्ल्यानंतर लगेचच पाणी पिऊ नये. कलिंगडमध्ये साधारण ९२ ते ९६ टक्के पाण्याचं प्रमाण असते. यामुळे अगोदरच आपल्या शरीरात पाण्याचे प्रमाण चांगले असते त्यामुळे कलिंगड खाल्ल्यानंतर लगेचच पाणी पिणे शक्यतो टाळावे. पाण्याचे प्रमाण जास्त असणाऱ्या फळांवर पाणी पिल्यास कॉलरा देखील होऊ शकतो. मात्र फळ इंफेक्टेड असेल, तरच असं होऊ शकते.फळांमध्ये पाण्याचं प्रमाण जास्त आहे, म्हणून कुणीही ते खाऊ शकत नाही. किडनीचे रुग्ण, मधुमेहाचे रुग्ण आणि हृदयाचा आजार ज्यांना असेल, त्यांनी कलिंगड खाणे शक्यतो टाळावे.

## दिवसाची सुरुवात योग्य आणि हेल्दी नाश्त्याने

सकाळी नाश्ता करण्याचे महत्त्व सगळ्यांना माहीत असले, तरी कित्येकांची अवस्था कळते; पण वळत नाही अशी असते. दररोज सकाळी न चुकता हेल्दी नाश्ता करणे म्हणजे निरोगी आयुष्याची सोय करून ठेवणे आहे.दिवसाची सुरुवात आपण योग्य आणि हेल्दी अशा नाश्त्याने करायला हवी याबाबत कोणाचे दुमत नसेल. असे असले, तरीही बरेच जण सकाळचा नाश्ता नीट घेत नाहीत. त्यामागचे एक कारण म्हणजे काही लोकांना या वेळेस भूकच लागत नाही. काही लोक कॅलरी नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि वेळच मिळत नाही, या सबबीवर नाश्ता करत नाहीत. खर तर उत्तम आरोग्य हवे असेल आणि वजन आटोक्यात ठेवायचे असेल, तर सकाळच्या हेल्दी नाश्त्याला पर्याय नाही.
सकाळच्या नाश्त्याचे फायदे- चयापचय सुधारते : सकाळी सकाळी योग्य अन्न खाल्ल्याने आपले चयापचय किंवा मेटाबोलिझम चांगले राहाते. यामुळे शरीर उत्साही राहाते. सकाळी काही खाल्ले नाही, तर मेंदूला चुकीची सूचना मिळते आणि शरीर कॅलरी राखून ठेवण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे चयापचय दिवसभरासाठी मंदावते.अभ्यासात लक्ष लागणे : शाळेत जाणारी बरीचशी मुले, विशेष करून जी सकाळी लवकर शाळेत जातात, त्यांना नाश्ता करून जाण्याची सवय नसते. मग, ही मुले घाईगडबडीत एखादा कप दूध पिऊन शाळेत जातात. अशी मुले शाळेतील अभ्यास नीट आत्मसात करू शकत नाहीत. यासाठी मुलांनी रात्री थोडे लवकर झोपून आणि सकाळी थोडे लवकर उठून काहीतरी नाश्ता करून शाळेत गेले पाहिजे.
नाश्ता केल्याने दिवसभराचा मूड चांगला राहातो : सकाळच्या हेल्दी नाश्त्याने रक्तातील साखर नियंत्रणात राहाते आणि त्यामुळे दिवसभर मूड चांगला राहातो. वजन नियंत्रणात राहाते : हेल्दी नाश्त्याने वजन नियंत्रणात राहू शकते; कारण त्यामुळे आपले चयापचय सुधारत असते. मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदय रोगापासून लांब राहाणे शक्य होते : वजन नियंत्रणात राहिले आणि रक्तातील साखरेचे व्यवस्थित चयापचय झाले, तर मधुमेह, उच्च रक्तदाब आणि हृदय रोगापासून लांब राहाणे शक्य होते.नाश्ता कसा असावा?तेलकट तुपकट नको, पारंपारिक पद्धतीचा उदा. उपमा, पोहे, इडली, जास्त हेल्दी नाश्ता हवा असेल, तर ओट्स, दलिया, सोया, सुजी, मोड आलेले मूग वाफवून किंवा त्यांचे धिरडे तसेच मिश्र पिठाचे धिरडे असा नाश्ता करावा. नुसती फळं खाणे हा देखील एक उत्तम पर्याय आहे. अंडं किवा टोफू सँडविच; पण ते व्हीट ब्रेड बरोबर खाणे हा देखील उत्तम पर्याय आहे. नाश्त्यासाठी थोडा वेळ राखून ठेवणे आवश्यक आहे. आपण रोजच आपल्या कामासाठी किंवा शाळा, क्लाससाठी धावत असतो. अशावेळी आपल्या व्यग्र आयुष्यात थोडा वेळ स्वतःसाठी नक्कीच द्यायला हवा. आपण जेवायला वेळ देतोच; पण नाश्ता हे दिवसातले सगळ्यात महत्त्वाचे अन्न असल्यामुळे त्याच्यासाठी खास वेळ काढणं फार गरजेचं आहे.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com




# खा.राहुल गांधी वाढदिवसानिमित्त जिल्हा कॉँग्रेसच्यावतीने शालेय साहित्याचे वाटप

धाराशिव दि.१९ (प्रतिनिधी) – भारतीय राष्ट्रीय कॉँग्रेसचे माजी अध्यक्ष तथा खासदार राहुल गांधी यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप दि.१९ जून रोजी करण्यात आले. धाराशिव तालुक्यातील बेंबळी येथील जिल्हा परिषदेच्या कन्या प्रशाला व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी कॉँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष ड.धिरज पाटील, मुख्य संघटक राजाभाऊ शेरखाने, उपाध्यक्ष खलील सय्यद, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक उमेशराजे निंबाळकर, डीसीसी बँकेचे संचालक मेहबूब पाशा पटेल, जिल्हा कॉँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष प्रशांत पाटील, माजी नगरसेवक सिद्धार्थ बनसोडे, पंचायत समितीचे माजी उपसभापती सत्तार शेख, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत , अशोक बनसोडे, चंद्रकांत डांगे, दादा पाटील, सौरभ गायकवाड, संजय देशमुख, दत्ता डांगे, सरपंच बोदला दत्तु गायकवाड, सुशांत रोकडे, मुख्याध्यापिका सांगळे, ग्रा.प.सदस्य गुलाब दर्याजी, हनुमंत सरवदे, अहमद कुरेशी, भैय्या सगट, सादिक शेख, बालाजी माने, असीफ पठाण, जावेद शेख, मुन्ना गोसावी, अश्फाक शेख, बाबा बोरुडे, सद्दाम शेख, समीर मुस्ताक, हुसेन सय्यद आदींसह कॉँग्रेसचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष दुधगावकर यांनी केला सौदागर यांचा सत्कार



धाराशिव दि.१८ (प्रतिनिधी) – तुळजापूर येथील युवा लेखक व कवी देविदास सौदागर यांच्या उसवण या कादंबरीसाठी साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. त्याबद्दल त्यांचा राष्ट्रवादी कॉँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष संजय पाटील दुधगावकर यांनी त्यांच्या घरी जावून कुटूंबासह सत्कार केला.

यावेळी त्यांचा कुटुंबातील आई–वडील पत्नी यांचाही सत्कार केला. यावेळी तुळजापूरचे माजी नगराध्यक्ष तुळशीदास साखरे, संजय देवकते, अनिल जाधव, गणेश लोंढे, देविदास सौदागर यांचे वडील महादेव सौदागर, आई बालिका सौदागर, पत्नी वर्षा सौदागर आदी उपस्थित होते. यावेळी दुधगावकर म्हणाले की, काळजात लेण्या कोरताना हा कवितासंग्रह त्यांचा यापूर्वीचा कवितासंग्रह. शिलाई काम करता करता आपल्या मनातल्या सुखदु:खाच्या गोष्टी त्यांनी त्या कवितेत मांडलेल्या होत्या. अत्यंत उमदा असा कवी पुढे कादंबरीकडे वळला आणि त्यांनी उसवण ही कादंबरी लिहिली. त्या कादंबरीला आता साहित्य अकादमीचा युवा पुरस्कार जाहीर झाला आहे. ही खूप अभिमानास्पद आणि अभिनंदनीय गोष्ट आहे. मराठवाड्यासाठी आणखीन एक शिरपेच रोवला गेला आहे. वीरा राठोड, रवी कोरडे यांच्यानंतर मराठवाड्याच्या वाट्याला आलेला हा तिसरा युवा साहित्य अकादमी पुरस्कार आहे.

# हरणाचे वस्त्र हवे म्हणून रामायण झाले आणि वस्त्रांचे हरण झालं म्हणून महाभारत घडले

## रामायणाचार्य समाधान महाराज यांचे प्रतिपादन

**ॲड.शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी– हरणाचं वस्त्र हव म्हणून रामायण झाले आणि वस्त्रांचं हरण झालं म्हणून महाभारत घडले असे प्रतिपादन रामायणाचार्य ह भ प श्री समाधान महाराज शर्मा यांनी व्यक्त केले.

प.पुज्य. माऊलींच्या २४ व्या पुण्यस्मरण सोहळ्यात राम कथेच्या सहाव्या दिवशी महाराज बोलत होते जीवनात साधूच्या वेषातील रावणांना ओळखायला शिका त्यासाठी साखरवाडीत या येथील माऊलींच्या पावन समाधीचे दर्शन घ्या नुकतीचा प्रसाद घ्या आणि आपल्या जीवनाची सार्थकता करा असे स्पष्ट केले.

कथेमुळे माणूस विचार मुक्त होतो विकार मुक्त होतो विषादमुक्त होतो विलास मुक्त होतो विपरीत भाव मुक्त होतो अशी कथेच्या श्रवणाची फलश्रुती आहे आपल्याला काय आवडतं याहीपेक्षा देवाला ,संताला काय आवडतं हे लक्षात घ्या , देवाच्या , संताच्या दरबारी यायचं तर त्यांना आवडेल तेच करा जप करा, नामस्मरण करा, सेवा करा, कारण जप हाच माणसाला तारतो, आपण जप कराल तर तो देव हीआपल्याला जपेल म्हणून आपण मुखाने हरे रामा हरे रामा ,हरे कृष्णा हरे कृष्णा हा नामघोष टाळी वाजवून करा टाळी वाजवल्यानंतर देहातील विकार रुपी दोष पक्षी उडून जातात असे श्री समाधान महाराज यांनी स्पष्ट केले आजच्या राम कथेत भरत रामाची भेट नंदिग्राम आत तिथे रामाच्या पदुका ठेवून भरत थांबले तिथे होते त्यानंतर अरण्य कांडा ची कथा आत्रीच्या आश्रमात प्रभू रामचंद्र प्रवेश सीतेचे अनुसया मातेची दर्शन प्रभू रामचंद्र सीतामाई साठी सुंदर हार करतात ही कथा नंतर विराज नावाच्या राक्षसाचा वध अगस्ती मुनी चे आगमन पंचवटी तील कथा, शूरपणका आश्रमात येते, रामाशी लग्न करण्याची इच्छा करते लक्ष्मण शुरपणकेचा बाणाने वध करतात, पुढे मायावी रूप धारण करून सीतेचे हरण होते. सीता लक्ष्मणाला दोष देते लक्ष्मणाची इच्छा असते की रामप्रभू येईपर्यंत सीतामातेने पर्णकुटीच्या बाहेर जाऊ नये पण नको ते घडते प्रभू रामचंद्राला बोलवण्यास लक्ष्मण बाहेर जातात आणि हीच वेळ साधून मारीची राक्षसाला रावण पाठवतो आणि भगव्या वस्त्राने भुरळ पडते व सीतेचे हरण होते आणि रामायण घडते.



पुढे शबरीची कथा खूपच सुंदर रित्या समाधान महाराज यांनी सांगितली सोळा वर्षाची तरुण असल्यापासून शबरी रामाची प्रतीक्षा करत होती ती ८० वर्षाची झाल्यानंतर म्हणजे तब्बल ६४ वर्षांनी प्रभू राम शबरीला भेटले तोपर्यंत रात्रंदिवस अष्टोप्रहर फक्त राम राम राम राम राम राम राम आणि राम असा जप धावा आणि चिंतन शबरी करते आश्रमात शबरीच्या प्रभुराम येतात त्यांचे चरण आपल्या तळहातावर घेऊन त्यांचे पूजन करताना डोळ्यातील अश्रूंनी चरणावर अभिषेक होतो अशी एकनिष्ठ अखंड भक्ती शबरीने प्रभुरामाची केली त्यात भाव प्रतीक्षा दृढता संयम आणि एकनिष्ठता होती म्हणून त्यांना प्रभू रामाचे दर्शन भेट घडली. पुढे सुंदर कांडात कथा प्रवेश ते व हनुमानजींचा प्रवेश होतो ही कथा आपल्या रसाळ वाणीतून समाधान महाराज यांनी अफाट माऊली भक्त समुदायासमोर सांगून श्रोत्यांना भक्ती सागरात मंगल स्नान घडवले दुनिया न चले, राम के बिना राम के बिना ना हनुमान जी के बिना हे खूप सुंदर रित्या म्हटले.

या उत्तरेश्वर महादेवाची आणि हनुमानजींची उपासना माऊली दादांनी केली त्या माऊलींच्या जगत उद्धाराची कीर्ती व त्यांची भक्ती याचा सूर्य कदापि मावळणार नाही हात दृढविश्र्वास व्यक्त केला. संसार वाट लावतो तर संत वाट दाखवतात आपण इथे येता माऊलींचे दर्शन घेता तेव्हा मर्यादा शांतता ठेवली पाहिजे आपण पोटभर प्रसाद घ्या पण बांधून घेऊन जाऊ नका या माऊलींनी आपले सर्वस्व जगत जीवाच्या कल्याणासाठी समर्पित केले तिथे येऊन कोणती तरी सेवा माऊलींच्या चरणी करा हीच हात जोडून माझी सर्वांना विनंती असल्याचे श्री समाधान महाराज म्हणाले. दररोज ठीक दोन ते पाच श्री समाधान महाराज शर्माजी यांची राम कथा अत्यंत उद्बोधक, अभ्यासपूर्ण रसाळ तुलसी रामायण मधील एकाहून एक अशा सुंदर चौपाया, संत तुकाराम संत ज्ञानोबा, संत तुकडोजी महाराज यांची अभंग वचने गोड आणि पहाडी आवाजात आणि लयबद्ध संगीत साथीमध्ये महाराजांनी म्हटली व भक्त समुदायाकडून टाळी वाजवून म्हणून घेतली सारे कथा सभागृह जय जयकार नामघोष आणि माऊलींच्या नामस्मरणाने सोडले. सर्वप्रथम कथाकार शर्माजी यांचे आगमन होताच माऊली संस्थान कडून ह भ प श्री महादेव महाराज माऊली तात्या,, ह भ प श्री नारायण महाराज भाऊ हे संत पूजन करतात तदनंतर हनुमान चालीसा होऊन प्रभुरामाच्या गोड नामस्मरण नंतर हर हर महादेव चा जयघोष आणि माऊली दादांचा जयजयकार आकाशी भिडणाऱ्या आवाजात होऊनच राम कथा आरंभ होते. अत्यंत सुंदर आणि रसाळ अशी कथा पूर्णतः रामकथेत एकरूप करून टाकण्याची लीलया कसाब आणि ज्ञान हाच खरा त्यांना माऊलींनी दिलेला कृपाशीर्वाद आहे याची अनुभूती येते.

# पत्रकार बाळासाहेब जाधव यांना राज्यस्तरीय महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कार जाहीर

लातूर / प्रतिनिधी- महात्मा कबीर समता परीषदेच्यावतीने पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील कार्याबद्दल लातूर येथील जननायकचे कार्यकारी संपादक तथा व्हाईस ऑफ मिडीयाचे मराठवाडा कार्यवाहक बाळासाहेब जाधव यांना महाराष्ट्र भूषण व जीवन गौरव पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला असून या संबंधीचे निवड पत्र महात्मा कबीर समता परिषदेचे संस्थापक अध्यक्ष डॉ.मुकुंदजराज पाटील यांच्या हस्ते देण्यात आलेले आहे.

पत्रकारिता क्षेत्रामध्ये २००७ ते २०२३ या कालावधीमध्ये केलेल्या पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रातील कार्याची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार जाहीर करण्यात आलेला आहे. त्यांनी जननायकचे संपादक अजितसिंह पाटील कव्हेकर, निळकंठराव पवार, यांच्या मार्गदर्शनाखाली वृत्तपत्र जननायकच्या माध्यमातून सामाजिक प्रश्न सोडविण्याचे काम केलेले आहे. त्यांना जाहीर झालेल्या पुरस्काराबद्दल पत्रकार संगम कोटलवार, राम जेवरे, महादेव कुंभार, शहाजी पवार, शशिकांत पाटील, नर्सिंह घोणे, हणमंत गायकवाड, संदीप शिंदे, राजकुमार जोंधळे, योगीराज पिसाळ, संदीप भोसले, अरूण हांडे, दिलीप मुनाळे, राजहंस कांबळे, गौतम कांबळे, आनंद माने, सुभाष सगर, सचिन चांडक, संजीव पाटील, माधव गायकवाड, रविंद्र जगदाळे, चंद्रशेखर पाटील, चंद्रकांत दुधाळे, गोपाळ खोंडे, उमकांत दर्शने, राहुल बिराजदार, संकेत गवळी यांच्यासह इतर पत्रकार बांधवांकडून त्यांचे कौतुक होत आहेत.



# सांगलीचे खासदार विशाल पाटील यांनी घेतले तुळजाभवानीचे दर्शन

तुळजापूर दि.१९ (प्रतिनिधी) – सांगलीचे नवनिर्वाचित खासदार विशाल पाटील यांनी तुळजापूर येथे निवडणुकी नंतर प्रथमच श्री तुळजाभवानी मातेचे दि.२८ जून रोजी दर्शन घेतले. तुळजाभवानी मातेच्या दर्शनानंतर त्यांनी माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांच्या अणदूर येथील निवास्थानी भेट देऊन स्नेहभोजन घेतले. तर माजी मंत्री चव्हाण खा पाटील यांचा सत्कार करून पुढील राजकीय कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य बाबुराव चव्हाण, महाराष्ट्र प्रदेश कॉँग्रेसचे महासचिव अभिजित चव्हाण, रणवीर चव्हाण आदी उपस्थित होते.

# निश्चित ध्येय, जिद्द, नियोजनबध्द अभ्यासाच्या बळावर लातूरचा रोहित बनला अभियंता

लातूर : परिस्थितीबद्दल कसलीही तक्रार न करता निश्चित ध्येय, इच्छाशक्ती, जिद्द, आणि अभ्यासाचे योग्य नियोजन करीत लातूरच्या रोहित श्रीकिशन कावळे या युवकाने स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी मिळवत आपल्या आई वडिलांचे स्वप्न साकार केले आहे. विशेष म्हणजे शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळात छत्रपती संभाजी नगर येथे तो कनिष्ठ अभियंता या पदावर रुजू देखील झाला आहे.

रोहितचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण हे लातूरात झालेले आहे. शालेय जीवनापासूनच त्याने अभियंता होण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. त्या अनुषंगाने बारावी नंतर कोल्हापूर येथील नामांकित केआयटी अभियांत्रिकी महाविद्यालयातून त्याने विशेष प्राविण्याने स्थापत्य अभियांत्रिकीची पदवी प्राप्त केली.

शासनाच्या सरळ सेवा भरती प्रक्रियेत रोहितची जलसंपदा विभाग, जिल्हा परिषद, नगर परिषद अशा आस्थापनावर स्थापत्य अभियंता म्हणून पहिल्या रँक मध्ये निवड झाली होती मात्र रोहितने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राष्ट्रीय महामार्ग मंडळात छत्रपती संभाजी नगर येथे कनिष्ठ अभियंता या पदास पसंती देऊन कार्यरत झाला आहे. स्थापत्य अभियांत्रिकी क्षेत्रात भरीव कामगिरी करण्याचे रोहितचे ध्येय आहे. यासाठी स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून अभियांत्रिकीतील उच्च पद मिळवून समाजाची सेवा करण्याचा मानस रोहितने व्यक्त केला आहे. निश्चित ध्येय, अभ्यासाचे योग्य नियोजन, जिद्द, चिकाटी, कुटुंबाची साथ या जोरावर रोहितने मिळवलेले यश उल्लेखनीय आणि या क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना दिशादर्शक असेच आहे.

# माझ्यासारख्या कुठल्याही राजकीय प्राश्वभूमी नसलेल्या व्यक्तीला आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे खासदार होता आले

लातूर /प्रतिनिधी- माझ्यासारख्या कुठल्याही राजकीय प्राश्वभूमी नसलेल्या व्यक्तीला आपल्या सर्वांच्या आशीर्वादामुळे खासदार होता आले.महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी उन्हाची तमा न बाळगता माझ्या विजयासाठी अटोकाट प्रयत्न केले या विजयाचे श्रेय आपले आहे .आपण केलेल्या परिश्रमाची उत्तराई करण्यासाठी येथून पुढील काळात प्रामाणिकपणे काम करणार असल्याचे नूतन खासदार डॉ शिवाजी काळगे यांनी सांगितले .

नूतन खासदार डॉ शिवाजीराव काळगे हे निवडून आल्यानंतर प्रथमच रेणापूर तालुक्यात आल्याने त्यांचे माहविकास आघाडीच्या वतीने फटाक्यांची आतषबाजी करीत जंगी स्वागत करण्यात आले. येथील ग्रामदैवत रेणुका मातेची पुजा करून आर्शिवाद घेतले .

लोकसभा निवडणूकीत महाविकास आघाडीचे उमेदवार डॉ . शिवाजी काळगे निवडून आले .खा.डॉ . काळगे यानी रेणापूर तालुक्यातील मतदारांचे आभार मानण्यासाठी रेणुका देवीमंदिर सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले . या



कार्यक्रमास माजी आ. त्र्यंबक नाना भिसे , रेणा सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे , माजी चेअरमन यशवंतराव पाटील, व्हा चेअरमन अनंतराव देशमुख ,लातुर ग्रामीणचे निरीक्षक अनुप शेळके , राष्ट्रवादी कॉंग्रेसचे ( शरदचंद्रजी पवार ) तालुकाध्यक्ष बालाजी कदम , लालासाहेब चव्हाण , उमाकांत खलंग्रे , प्रविण पाटील ,कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष ड प्रमोद जाधव , शहराध्यक्ष मतीन अली सय्यद यांच्यासह महाविकास आघाडीचे, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली . यानंतर रेणापूर शहर व तालुका कॉंग्रेस , रेणा सहकारी साखर कारखाना निवाडा ,राष्ट्रवादी कॉंग्रेस ( शरदचंद्रजी पवार) , शिवसेना ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) यांच्यासह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या वतीने नुतन खासदार डॉ . शिवाजी काळगे यांचा सत्कार करण्यात आला . तसेच रेणापूर तालुक्यातील पोहरेगाव , कोळगाव , खरोळा , कामखेडा , कारेपूर , निवाडा , यशवंतवाडी , खलंग्री , दवणगाव , डिघोळ देशमुख , सय्यदपुर , गरसुळी , बावची , इंदरठाणा यासह अदि ग्राम पंचायतीच्या सरपंच , उपसरपंच व सदस्य यांच्या वतीने खासदार डॉ काळगे यांचा सत्कार करण्यात आला तसेच तालुक्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व सन्माननीय पदाधिकारी यांच्या वतीने सत्कार करण्यात आला . तसेच दत्त कृपा मजुर सहकारी संस्थेचे च्या वतीने सत्कार करण्यात आला .

रेणापूरात जंगी स्वागत नुतन खासदार डॉ शिवाजी काळगे रेणापूर शहरात आल्यानंतर फटाक्यांची आतषबाजी करत डॉ . काळगे यांचे जंगी स्वागत करण्यात आले. ग्रामदैवत रेणुका मातेचे दर्शन घेतल्या नंतर ट्रस्टच्या वतीने रेणुका मातेची प्रतिमा भेट देवुन सत्कार करण्यात आला .

## पान १ वरून

### आगीत...

त्यांना इतिहासाचे पुनरुज्जीवन करून चांगल्या भविष्याचा पाया घालणे जमते, असे मोदी म्हणाले.

नालंदा हे केवळ भारताच्या भूतकाळाशीच निगडीत नाही, तर जगातील आणि आशियातील अनेक देशांचा वारसा त्याच्याशी निगडीत आहे. आमच्या भागीदार देशांनीही नालंदा विद्यापीठाच्या पुनर्बांधणीत सहभाग घेतला आहे. या निमित्ताने मी भारताच्या सर्व मित्र देशांचेही अभिनंदन करतो. प्राचीन नालंदामध्ये मुलांचा प्रवेश त्यांच्या ओळख किंवा राष्ट्रीयत्वाच्या आधारावर केला जात नव्हता. प्रत्येक देशातून आणि प्रत्येक वर्गातील तरुण इथे यायचे. नालंदा विद्यापीठाच्या या नव्या कॅम्पसमध्ये पुन्हा तीच प्राचीन व्यवस्था अधिक प्रभावीपणे राबवली जाईल. वसुधैव कुटुंबकम् याचे नालंदा हे सुंदर प्रतीक आहे, असेही मोदींनी अभिमानाने सांगितले.

### जम्मू-काश्मीरच्या...

की, जिल्ह्यातील सोपोरमधील हदीपोरा भागात दहशतवादी लपल्याची गुप्त माहिती मिळाली होती. यानंतर लष्कर, सीआरपीएफ आणि पोलिसांच्या संयुक्त पथकाने शोधमोहीम सुरू केली. यावेळी अचानक दहशतवाद्यांनी गोळीबार सुरू केला.

सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर देण्यासाठी गोळीबार केला, या घटनेत दोन दहशतवादी ठार झाले. मात्र, अद्याप दहशतवाद्यांची ओळख पटलेली नाही. दरम्यान, या चकमकीत एसओजीच्या एका जवानाला गोळी लागली असून, त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या परिसरात शोधमोहिम सुरू आहे.

### मुंबईतील ५०...

बॉम्बने उडवून देण्याची धमकी दिली. धमकीचा ई-मेल मिळाल्यानंतर कॉलेज प्रशासनाने जवळच्या पोलिस स्टेशनला यासंदर्भात माहिती दिली. त्यानंतर पोलिस आणि बॉम्बशोधक पथकाचे अधिकारी आले आणि त्यांनी तपास केला पण काहीही संशयास्पद आढळले नाही.

प्रकरणाचा शोध सुरू

मुंबईतील अनेक नामांकित रुग्णालयांना त्यांच्या ई-मेल आयडीवर हा धमकीचा ई-मेल आला आणि धमकीचा ई-मेल बीबल डॉट कॉम नावाच्या वेबसाइटचा वापर करून पाठवण्यात आला. धमकीचा ई-मेल पाठवणारी व्यक्ती अद्याप सापडलेली नाही. धमकीचा ई-मेल पाठवण्यामागचा हेतू काय होता, याचा पोलिस शोध घेत आहेत.

### मुंबई हे...

त्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर मुंबई एक आकर्षक ठिकाण बनत आहे. त्यामुळेच कदाचित मुंबईत राहणे थोडे महागले असावे, असे राहुल शर्मा, इंडियन मोबिलिटी लीटर मर्सर यांनी सांगितले आहे. दिल्लीतील घरभाड्यात वाढ झाली आहे.

### अरविंद केजरीवाल...

सांगितले होते, मात्र त्यांनी सांगितले की त्यांचे वकील त्यांच्या वतीने न्यायालयात युक्तिवाद करतील.

दिल्लीतील मद्य धोरणातील कथित घोटाळ्याप्रकरणी ईडीने २१ मार्च रोजी केजरीवाल यांना त्यांच्या घरातून अटक केली होती. पहिले ११ दिवस ते ईडीच्या कोठडीत राहिले आणि १ एप्रिल रोजी न्यायालयाने त्यांना १५ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत तिहार तुरुंगात पाठवले. १० मे रोजी तुरुंगातून बाहेर येईपर्यंत केजरीवाल ५० दिवस तिहार तुरुंगात बंद होते. जामिनावर असताना केजरीवाल यांनी आपल्या पक्षासाठी जोरदार प्रचार केला आणि २ जून रोजी तुरुंगात आत्मसमर्पण केले होते.

### जागतिक...

देत फिचने अंदाजात सुधारणा केली. फिचने आपल्या रिपोर्टमध्ये आमचा अंदाज आहे की २०२४-२५ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्था ७.२ टक्क्यांनी वधारेल.

जून महिन्याच्या सुरुवातीला रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) ग्रामीण भागातील मागणीत सुधारणा आणि चलनवाढ कमी झाल्यामुळे चालू आर्थिक वर्षात ७.२ टक्के दराने अर्थव्यवस्था वाढीचा अंदाज वर्तवला. रेटिंग एजन्सीने म्हटले की, गुंतवणूक वाढत राहील. परंतु अलीकडील तिमाहीपेक्षा कमी दर तर ग्राहकांचा आत्मविश्वास वाढल्याने ग्राहक खर्चात सुधारणा होईल. खरेदी व्यवस्थापकांचे सर्वेक्षण डेटा पॉइंट्स चालू आर्थिक वर्षाच्या सुरुवातीस सतत वाढ दर्शवत आहे.

### अनाधिकृत...

मालमत्ताधारकांवर व एजन्सीधारकांवर क्षेत्रिय अधिकारी यांच्यामार्फत गुन्हा नोंद करण्याची सक्त कार्यवाही करण्याचे आदेश मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी दिलेले आहेत. तरी ज्या खाजगी ईमारतीवर अनधिकृत होर्डींग्ज आहेत, त्या तात्काळ काढून घेवून मनपास सहकार्य करावे. सदरील होर्डींग्जमुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना किंवा अपघात झाल्यास सदर मालमत्ता धारकांवर व एजन्सीधारकांना जबाबदार धरण्यात येईल. तसेच मनपा मार्फत काढण्यात आलेल्या होर्डींग्जसचा खर्च मालमत्ताधारकांकडून वसूल करण्यात येईल. तसेच मनपाने परवानगी दिलेल्या युनिपोलवरील जाहिरात बॅनर्स बंद करुन वादळी वारे व वादळी पाऊसच्या संभाव्य शक्यतेमुळे फ्लेक्सी व इतर साहित्य काढून मोकळे ठेवणे बाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

### एनडीए...

काम केले ते काम आता करू शकत नाही. लोकसभा निकालात इंडिया आघाडीला २३४ जागा मिळाल्या, तर भाजपाच्या नेतृत्वातील एनडीएकडे २९३ जागा आहेत. राहुल गांधी भारतीय राजकारणात खूप पुढे गेले. लोकसभेत विरोधी पक्षनेत्याची जबाबदारी राहुल गांधींना मिळू शकते असं काँग्रेस नेते सांगत आहेत.

### लातूर जिल्हा...

मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी काही दिवसापूर्वी राज्याचे सार्वजनिक आरोग्य मंत्री, प्रा तानाजी सावंत यांची भेट घेऊन कृषी महाविद्यालयाच्या जागेचे बाजार मूल्य म्हणून ३ कोटी ३२ लाख ६८ हजार रुपये वसंतराव नाईक मराठवाडा विद्यापीठात वर्ग करण्याची विनंती केली होती, या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत, त्यांनी सदरील निधी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडे वर्ग करण्यास मंजुरी दिली आहे. लातूर जिल्हा रुग्णालयासाठी जागा उपलब्ध होण्याचा प्रश्न आता मार्गी लागला असल्यामुळे लवकरात लवकर हे रुग्णालय उभारले जाईल या ठिकाणी, सर्वसामान्य रुग्णांना उच्च दर्जाच्या अद्यावत आरोग्य सुविधा उपलब्ध होतील असे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे. सदरील जागा उपलब्ध होण्यासाठी माझं लातूर परिवारासह विविध संस्था संघटना यांनीही प्रयत्न केले असून त्या सर्वांच्या प्रयत्नाला यश आले असल्याचे सांगून त्यांचेही आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आभार मानले आहेत.

# महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी आणि पालकांचे उत्साहात स्वागत



**लातूर :** महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालय, लातूर येथे बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांच्या आज दि. १८ जून २०२४ पासून नियमित वर्गांना सुरुवात झाली.

महात्मा बसवेश्वर कनिष्ठ महाविद्यालयातील बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचा महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांच्या हस्ते पुष्पहार तर विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ आणि पेढे देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार, पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे, बोर्ड समन्वयक डॉ. गुणवंत बिरादार, कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती.

आज महाविद्यालयातील बारावी कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा पहिला दिवस असल्याने स्वागत समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देताना प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई म्हणाले की, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय हे महाराष्ट्रातील ०५ शाखांमधून शिक्षण देणारे एकमेव महाविद्यालय आहे. या महाविद्यालयाला नॅकने अ दर्जा बहाल केला आहे. महाविद्यालयात येणारा विद्यार्थी ग्रामीण व शहरी भागातील असून गरीब आणि गरजू विद्यार्थी येथे शिक्षण घेतात. आज पालक आणि विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ बघून मनस्वी आनंद झाला. यावेळी उपप्राचार्य प्रा. संजय पवार म्हणाले की, लातूरच्या शैक्षणिक प्रगतीमध्ये नियमित वर्गात उपस्थित राहून नियमित अभ्यास केल्यास विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ होते. हा लातूर पॅटर्नचा यशस्वी होण्याचा सर्वोत्तम मार्ग आहे. याशिवाय विद्यार्थ्यांच्या इतर कलागुणांचा व विविध सांस्कृतिक कार्यक्रमामुळे वाढ होते असे सांगून त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे आभार पर्यवेक्षक प्रा. शिवशरण हावळे यांनी मानले. यावेळी कार्यालय प्रमुख नामदेव बेंदरगे यांनीही विद्यार्थी आणि पालकांना शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजाभाऊ बोडके, शुभम बिरादार आणि जगन्नाथ येचेवाड यांनी परिश्रम घेतले.

# जंगम समाजातील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळ्याचे आयोजन

**लातूर :** लातूर जिल्हा सकल जंगम समाज बांधवांच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी जंगम समाजातील गुणवंत विद्यार्थी गुणगौरव सोहळा आयोजित करण्यासाठी जंगम समाज बांधवांची चर्चात्मक बैठक बिडवे ग्रीन हॉल, राजीव गांधी चौक, लातूर येथे संपन्न झाली ,

सदरील बैठकीत चर्चा होऊन हा कार्यक्रम श्री,ष.ब्र.१०८ शंभुलिंग शिवाचार्य महाराज मठ संस्थान अंबेजोगाई यांच्या दिव्य सानिध्यात,

लातूर लोकसभा मतदार संघाचे नवनिर्वाचित खासदार डॉ. शिवाजी बंडपा काळगे यांचा समाज बांधवांच्या वतीने सत्कार करून इयत्ता १० - १२ वी गुणवंत विद्यार्थी/विद्यार्थिनी,पदवी,पदविका, यूपीएससी,एमपीएससी,नीट उत्तीर्ण, इंजिनियर विविध क्षेत्रात यश संपादन केलेले समाज बांधव तसेच सन, २-२३ - २४ या वर्षात शासकीय सेवेत नवीन रुजू झालेले जंगम समाजातील शासकीय कर्मचारी यांना पण प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात येणार आहे .

या कार्यक्रमास राष्ट्रीय जंगम संघटनेचे संस्थापक श्रावण जंगम सातारा हे प्रमुख अतिथी असतील. ज्येष्ठ समाज बांधव विजयकुमार स्वामी उदगीर, सूर्यकांत अण्णा पत्रे निलंगा, गौरीशंकर प्रभुलिंग स्वामी व शिवशंकर प्रभुलिंग स्वामी, डॉ.अशोक स्वामी सांगवीकर अहमदपूर, मनोज सिद्राम स्वामी या प्रमुख मान्यवरांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रम गिरवलकर मंगल कार्यालय बार्शी रोड लातूर येथे रविवार दि. ७ जुलै २०२४ रोजी सकाळी १०:०० वाजता घेण्यात येणार आहे. तरी गुणवंत विद्यार्थ्यांनी, यूपीएससी, एमपीएससी, नीट उत्तीर्ण, पदविका, पदवी, तसेच नवीन सन २०२३ - २४ या वर्षात शासकीय सेवेत लागलेल्या जंगम समाजातील सर्व नवनिर्वाचित कर्मचारी यांनी आपले निवड पत्र व गुणवंतांनी आपले गुणपत्रक दि . ६ जुलै २०२४ पर्यंत श्रीधर स्वामी यांच्या ९३२६५१००१५ या व्हॉटसअॅप नंबरवर पाठवावेत या कार्यक्रमाचे प्रमुख मन्मथ बसवन स्वामी, उपाध्यक्ष दयानंद स्वामी कोकलगे घरणीकर , सचिव त्र्यंबक गुरुनाथ स्वामी हे असून सूत्रसंचलन शिवकांत स्वामी गुरुजी, कुमार स्वामी गणाचार्य व महिला प्रतिनिधी म्हणून सौ. संगीताताई चिट्टे या करणार आहेत.


नवनीत शिक्षण प्रसारक मंडळ नळेगाव द्वारा संचलित

## अनंत तुळजाराम नाईक विद्यालय,

नळेगाव ता. चाकूर जि.लातूर

**पाहिजेत**

आमच्या शाळेत खालील पद भरावयाचे आहेत तरी दि.२८-०६-२०२४ वार शुक्रवार रोजी ठीक ११:०० वाजता इच्छूक पात्रता धारकानी अनंत तुळजाराम नाईक विद्यालय, नळेगाव ता. चाकूर जि. लातूर येथे स्वखर्चाने मुळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित रहावे.

| अ.क्र. | पद | पदसंख्या | संवर्ग | शै. पात्रता |
|---|---|---|---|---|
| ०१ | प्रयोगशाळा सहाय्यक | १ | एस.सी. | १२ वी विज्ञान उत्तीर्ण किंवा विज्ञान शाखेतील पदवीधर |

स्वाक्षरीत

अध्यक्ष
न.शि.प्र.म.नळेगाव

अध्यक्ष
नवनीत शिक्षण प्रसारक मंडळ
नळेगाव ता. जि. लातूर



गुणवंत विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन...

दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

## दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

NAAC Reaccredited (III Cycle) : B++ (with CGPA 2.97)

प्रवेश चालू आहे

शै.वर्ष २०२४-२०२५ करिता प्रवेश देणे चालू आहे

बदलत्या काळानुसार वाणिज्य, व्यवस्थापन व संगणक शिक्षणास अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. तथापि, उद्योग, व्यवसाय, विविध कंपन्या, केंद्र व राज्य सरकारे इ.ना आवश्यक असलेल्या कौशल्यावर आधारित कुशल मनुष्यबळाचा तुटवडा जाणवत आहे. याकरिता महाविद्यालयामध्ये खालील **पदवी अभ्यासक्रम** चालविले जात आहेत. ज्यातून विद्यार्थ्यांना व्यवसाय व रोजगारांच्या संधी मोठ्या प्रमाणात निर्माण होत आहेत.

बी.कॉम./बी.व्होक./बी.बी.ए./बी.सी.ए.

| अ.क्र. | पदवी अभ्यासक्रम | पात्रता | कालावधी |
|---|---|---|---|
| ०१. | बी.कॉम. (General) | १२ वी पास | ३ वर्ष |
| ०२. | बी.कॉम. (Foreign Trade) | १२ वी पास | ३ वर्ष |
| ०३. | बी.कॉम. (Computer Application) | १२ वी पास | ३ वर्ष |
| ०४. | बी.कॉम. (Banking & Insurance) | १२ वी पास | ३ वर्ष |
| ०५. | बी.कॉम. (Accounting & Taxation) | १२ वी पास | ३ वष |
| ०६. | बी.कॉम. (Management & Entrepreneurship) | १२ वी पास | ३ वष |
| ०७. | बी.व्होक. (Cost & Management Accountancy) | १२ वी पास | ३ वर्ष |
| ०८. | बी.व्होक. (Financial Markets) | १२ वी पास | ३ वर्ष |
| ०९. | बी.सी.ए. | १२ वी पास | ३ वर्ष |
| १०. | बी.बी.ए. | १२ वी पास | ३ वर्ष |

महाविद्यालयाची वैशिष्ट्ये

१. ऑनलाईन अध्ययन, अध्यापन व मूल्यमापन (Virtual Classroom) २. स्मार्ट बोर्डस् क्लासरूम ३.अनुभवी व तज्ञ प्राध्यापक वृंद ४. कॅम्पस मुलाखतीद्वारे जवळपास २०० हून अधिक विद्यार्थ्यांची विविध कंपन्यांमध्ये निवड ५. अत्याधुनिक स्वतंत्र इमारत व सुसज्ज संगणक प्रयोगशाळा तसेच अखंडीत वीज पुरवठा ६.विविध विषयांचे अनेक ग्रंथ व भरपूर नियतकालीकांनी सुसज्ज असे समृद्ध ग्रंथालय ७. विविध नामांकित इन्स्टिट्यूट समवेत परस्पर सामंजस्य करार (MoU) ८. इंटरनेट सुविधा ९. भव्य क्रीडांगण, १०. गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या विविध सवलती ११. मुली व मुलांसाठी सर्व सोयींनीयुक्त स्वतंत्र वसतिगृह

विशेष सूचना : १. मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी शासन नियमांनुसार शासनाची शिष्यवृत्ती व फी सवलत
२. बी.सी.ए. व बी.बी.ए. ची प्रवेश प्रक्रीया महाराष्ट्र शासनाच्या MAH-CET नुसार होईल.

**Online Registration Website :** www.dcomm.org
**Registratioin Link :** https://enrollonline.co.in/Registration/Apply/DCCL

अधिक माहितीसाठी

बी.कॉम. व बी.व्होक. - श्री. शिवलिंग होटकर (९८२३१७५७५१),
बी.सी.ए. व बी.बी.ए. - श्री. सचिन शिंदे (९७६५३६००१२), महाविद्यालय : ०२३८२-२२१३४९

डॉ. राजाराम पवार
प्र.प्राचार्य
दयानंद वाणिज्य महाविद्यालय, लातूर

श्री. रमेशजी बियाणी
सचिव
दयानंद शिक्षण संस्था, लातूर

श्री. लक्ष्मीरमणजी लाहोटी
अध्यक्ष
दयानंद शिक्षण संस्था, लातूर


### जाहिर प्रगटन

विशेषतः मौजे मळवटी ता. जि. लातूर येथील सर्व जनतेस या जाहीर पटनाद्वारे सूचित करण्यात येते की, भाऊसाहेब विश्र्वनाथ गरड यांना त्याच्या पक्तिक कामासाठी रक्कम रुपये २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार रु. नके कर्ज इंदिरा महिला नागरी सहकारी बँक लिमिटेड शाखा लातूर यांच्याकडे गणी केली होती व ती मंजूर करून संबंधित बँकेने सदर कर्जासाठी त्यांची जे मळवटी ता. जि. लातूर येथील मिळकत गट नं. १४६ क्षेत्र ० हे ०२.९९ आर कार ०० रु ०७ पै. ज्याच्या चतुः सिम खालीलप्रमाणे आहेत
पूर्वेस : १० फुट रुंदीचा रस्ता
पश्चिमेस : तात्याराव गरड यांची जमीन.
दक्षिणेस : बिभीषण गरड यांची जमीन.
उत्तरेस : भाऊसाहेब विश्र्वनाथ गरड यांचे घर.
वरील मिळकत बँकेस गहानखत करून देणार आहेत तरी सदर र्जासाठी तारण म्हणून करण्यात येणाऱ्या वरील मिळकतिच्या गहाणखातस जर णाचा काही उजर आक्षेप वा हरकत किंवा बक्षीस पत्र खरेदीखत कर्जबोजा कोणत्याही कोर्टातील वाद किंवा दावा प्रलंबीत असेल व सदर मिळकत स्तांतरणाबाबत कुटलाही करार, ठराव किंवा व्यवहार ठरला असेल किंवा झाला सेल तर सदर जाहीर प्रगटण प्रसिद्ध झाले पासून ४ दिवसाच्या मुदतीत पण आपले उजर व आक्षेप जाहीर प्रगटण देणार यांच्या कार्यालयात लेखी वरूपात नोंदवावे व त्यांची रीतसर पोहंच घ्यावी अन्यथा सदर मिळकत निरंक वैद्ध समजण्यात येईल मुदतीनंतर येणारा आक्षेप विचारात घेतला जाणार ाही ह्याची कृपया नोंद घ्यावी.
: १९/०६/२०२४

सबब हे जाहीर प्रगटण

**तर्फे**
**अॅड. कल्पना एम. भुरे**

**जाहीर प्रगटन देणार**
**इंदिरा महिला नागरी सहकारी**
**बँक लि. शाखा लातूर**

### जाहीरनामा

**रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दि. अर्ज क. १३२/२०२४**
**नरसिंग व इतर / निरंक**
**निशाणी क. ०७**

**वारसाचे सर्टिफिकेटबाबत**

ज्यापेक्षा खिरु राम पवार राहणार मौजे फरदपूर ता. रेणापूर जि. लातुर हे ता. २७/०५/२०२३ रोजी किंवा त्या सुमारास मौजे फरदपूर ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आणि पुढील अर्जदारांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार ०१. नरसिंग पि. खिरु पवार वय-७० वर्षे धंदा-शेती,०२. निलू पि. खिरु पवार वय-६८ वर्षे धंदा-शेती, ०३. ज्ञानोबा पि. खिरु पवार वय-६५ वर्षे धंदा-शेती, ०४. नारायण पि. खिरु पवार वय-६०-वर्षे धंदा-शेती, ०५. विनायक पि. खिरु पवार वय-५५ वर्षे धंदा-शेती सर्व रा. फरदपूर ता. रेणापुर जि. लातूर अर्जदार यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार ध्याने हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत खिरु राम पवार वारस सर्टिफिकेट देईल.
पुढील तारीख १६.०७.२०२४
तारीख १९ माहे ०६ सन २०२४

**क.लिपिक**
**सह दि न्या**
**क.स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापुर**

### जाहीरनामा

**रेणापुर येथील राह दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दि. अर्ज ६ १२८/२०७४**
**हामीदाबी व इतर / निरक**
**निशाणी क ०७**

**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा रशीद इब्राहीम शेख राहणार मौजे इंदरठाना ता. रेणापूर जि लातुर ता. १२/०४/२०२४ रोजी किंवा त्या सुमारास मौजे इंदरठाना ता. रेणापूर जि लातूर येथे झाले आणि पुढील अर्जदारांनी ह्या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार ०१. हामिदाबी रशीद शेख वय-६५ वर्षे धंदा-घरकाम ०२. सुलतान रशीद शेख वय ३४ वर्षे धंदा शेती ०३. सुलेमान रशीद शेख वय-३० वर्षे धंदा-शेती ०४. लुकमान रशीद शेख वय- २६ वर्षे धंदा-शेती सर्व रा. इंदरठाणा ता. रेणापूर जि. लातूर. ०५. सुरैय्या सादेक शेख वय-३६ वर्षे धंदा-घरकाम ०६. - सुमय्या अनिस शेख वय २७ वर्ष धंदा-घरकाम ......अर्जदार दोघे रा. पिंपळा धायगुडा ता. केज जि. बिड. यानी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे त्यापेक्षा सदर अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखन कस कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत रशीद इब्राहीम शेख वारस सर्टिफिकेट देईल
पुढील तारीख-१६.०७.२०२४
तारीख १९ माहे ०६ सन २०२४

**क लिपिक**
**सह दि न्या**
**क. स्तर, रेणापूर**

**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापुर**

### जाहीरनामा

**रेणापुर येथील सह दिवाणी न्यायाधिश क स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**किरकोळ दि. अर्ज १३८/२०७४**
**सुंदर पवार व इतर / निरंक**
**निशाणी ०७**

**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा श्यामराव उर्फ शामराव आप्पाराव पवार राहणार मौजे वाला ता. रेणापूर जि लातुर हे ता. २७/०४/२०२१ रोजी किंवा त्या सुमारास मौजे वाला ता. रेणापूर जि. लातूर येथे राहते घरी मयत झाले आणि पुढील अर्जदारांनी ह्या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार ०१. सुंदर पि. शामराव पवार वय ७६ वर्षे धंदा-शेती ०२. आण्णासाहेब पि. शामराव पवार वय-४७ वर्षे धंदा-शेती ०३. व्यंकट पि. शामराव पवार वय-४२ वर्षे धंदा-शेती तिघेही रा. वाला ता. रेणापूर जि. लातूर. ०४. कौशल्या पि. आण्णासाहेब ठोंबरे वय ७० वर्षे धंदा-शेती रा.उंदरी ता. केज जि. बिड. ०५. अंजना पि. रंगनाथ अंबड वय-५२ वर्षे धंदा-शेती रा. लाडेगाव ता. केज जि. बिड. ०६. मंदाकिनी भ्र. सतीष थोरात वय-४५ वर्ष धंदा-घरकाम रा. बनकरंजा ता. केज जि. बिड..... अर्जदार यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे त्यापेक्षा सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याने आत त्याने हयात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि हया लेखावरून कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकतीन दाखविल्यावर सदर अर्जदार हक्काबद्दल लागलीय पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहून मयत श्यामराव उर्फ शामराव आप्पाराव पवार वारस सर्टिफिकेट देईल.
पुढील तारीख १८.०७.२०२४
तारीख १९ माहे ०६ सन २०२४

**क.लिपिक**
**सह दि न्या क स्तर**
**रेणापूर**

**सहा. अधिक्षक**
**दिवाणी न्यायाल**
**क.स्तर रेणापुर**

### टी.सी. हरवली आहे

सतीश रत्नाप्पा घेवारे या नावाची जनकल्याण निवासी विद्यालय हरंगुळ (बु) इ.१० वी पासची टी.सी. दि.०८/०६/२०२४ रोजी मुरुड-अकोला ते लातूर प्रवासात हरवली आहे. कृपया कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा.
**मोबा-७८७५४३९९८२**

### लातूर शहर महानगरपालिका, लातूर

**ई-निविदा क्रं. ११ सन २०२४-२५**

**(दुसरी वेळ)**

लातूर शहर महानगरपालिके मार्फत लातूर शहरामध्ये पुतळा उभारणी करणेच्या कामाकरिता सल्लागार अभियंता (PMC) नियुक्ती करणेच्या कामासाठी मा. आयुक्त यांच्याकडून ई-निविदा मागवण्यात येत आहेत. या कामासंबंधीचा तपशिल www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
दिनांकः१८/०६/२०२४

स्वाक्षरीत
अति.आयुक्त
लातूर शहर महानगरपालिका, लातूर


## कल्याण बाजार

| | | |
|---|---|---|
| १४९ | ४-६ | २६८ |
| २३९ | | ७९० |
| ४३-३४ | | ६८-८६ |

## मिलन नाईट बाजार

| | | |
|---|---|---|
| १४० | ५-७ | ११५ |
| २३० | | २२३ |
| ६८-८६ | | ७२-२७ |

गोल्डन विक्री चान्सेस

प्रो. योगेश कुमार
स्पेशल जोडी, सिंगल, पत्तीसाठी संपर्क साधावा.

संपर्क 99 93 94 16 69
98 98 20 38 88

## नशिबाची परिक्षा

गोल्डन विक्री चान्सेस

### मिलनम डे

कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:९-५-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 130 | ७-४ | 124 | जोड | 40-67-91-82-75 |
| 248 | | 467 | | |
| 220 | | 700 | | |

### कल्याणम

| उदय-अस्त | | सिंगल:०-३-७ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| 127 | ४-० | 158 | जोड | 06-24-39-57-48 |
| 280 | | 680 | | |
| 460 | | 455 | | |

### मुंबैम (मेन)

| उदय-अस्त | | सिंगल:७-१-४ मजबुत | | |
|---|---|---|---|---|
| १७९ | ०-७ | १४५ | जोड | 72-30-18-45-09 |
| २९८ | | २३५ | | |
| ३७७ | | ५५० | | |

संपर्क 99 75 47 98 26

**लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर**
**नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना**

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५0% |
| ४६ ते १८0 दिवस | ७.५0% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५0% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १0.५0% |
| ३६ महिने ते ६0 महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १0% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** 0.५0% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवीवर नियम व अटी लागु.



# यशवंत

गुरुवार दि. २० जून २०२४



# उदगीर

पान ८

कार्यालय :0२३८५-२५३११८ मो.९८५0२२८२४0

email - yashudgirram@gmail.com



**बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.**

**शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७**

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)

दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**

वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमस बँकींग, मोबाईल बँकींग


# देवणी येथे शेतकरी संघटनेच्या वतीने चक्का जाम आंदोलन



**देवणी (प्रतिनिधी)** शेतकरी संघटनेच्या वतीने शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष आनंद जीवने यांच्या अध्यक्षतेखाली शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी चक्काजाम आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनामध्ये सर्वच पक्षांनी शेतकरी संघटनेला पाठिंबा देऊन शेतकरी संघटनेच्या आंदोलना सोबत खांद्याला खांदा लावून सहभाग नोंदविला.

आंदोलन मध्ये शेतकऱ्यांच्या प्रश्नावर विविध पक्षांच्या मान्यवरांचे मनोगत व्यक्त करण्यात आले

शेतकरी संघटनेच्या वतीने प्रशासनास निवेदन देण्यात आले त्या निवेदनात पिक कर्जाचा व्याज परतावा मिळावा, पिक विमा, अनुदान लागु करुन शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करावे , दिवसा ८ तास लाईट मिळावे. अनधिकृत पणे पिक कर्ज वसुली च्या नावा खाली पिक कर्जदाराचे बॅक खाते होल्ड केले आहे.त्याची चौकशी करून बँक अधिकाऱ्यावर कारवाई करण्यात यावी हे मागण्या मान्य नाही झाल्यास शेतकरी संघटनेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा देण्यात आला.

या आंदोलनास सुरेंद्र आंबुलगे , मिथुन दिवे सर, गजानन ऊजळबे विकास नमनगे, मेळकुंदे मामा,भंडे दत्ता अर्जुने व अरविंद जी भातंबरे सर अमर अण्णा मुर्के अजित बेळकोने सोमनाथ लूले देविदास पतंगे शरण लुले अरुण पाटील औदुंबर पांचाळ माधवराव जी बिरादार श्रीमंतांना लुले योगेश जी तगरखेडे चेतनजी मिटकरी मल्लिकार्जुनईश्वरशेटेइब्राहिम तांबोळी करीम भाई शेख व तांबोळी परिवार खुरेशी चंद्रकांत माने पाटील पांडुरंग जी कदम साहेब कल्याण भाऊ धनुरे रमेश जी कोतवाल कोयले सर लक्ष्मण रणदिवे गिरधर जी गायकवाड साबणे सर सिद्राम डोंगरे बालाजी पाटील कालिदास बंडे किशोर जी पाटील पाटील पाटील विळेगावकर संजय जी अंबुलगेअजम भाई उंटवाले असे अनेक शेतकरी देवणी शहर व तालुक्यातून या रास्ता रोको आंदोलनात उपस्थित होते.

# पत्रकार विनोद मिंचे यांचे निधन

**उदगीर (प्रतिनिधी)** जेष्ठ पत्रकार ,कार्टुनिष्ठ विनोद मिंचे यांचे ह्यदविकाराने निधन उदगीर येथील जेष्ठ पत्रकार व कार्टुनिष्ठ विनोद सिद्रामप्पा मिंचे यांचे बुधवार दि.१९ जून २०२४ रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास संतोषी मातानगर उदगीर येथील राहत्या ह्यदयविकाराच्या झटक्याने दुःखद निधन झाले .मृत्यू समयी ते ५२ वर्षाचे होते .

विनोद मिंचे यांनी पत्रकारितेची सुरुवात दैनिक एकमत मध्ये कार्टुनिष्ठ म्हणून



केली व नंतर साप्ताहिक राजनेता सुरु केले . उदगीर तालुका पत्रकार संघाचे काही काळ कार्याध्यक्ष म्हुणून काम पाहिले. कलावंत, साहित्यीक,निर्भिड पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती.

त्यांच्यापश्चात पत्नी, दोन मुले, भाऊ ,बहिण असा परिवार असुन त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि.२० जून रोजी सकाळी ११ वाजता विरशैव लिंगायत स्मशानभुमी फुले नगर उदगीर येथे होणार आहे.

मिंचे परिवारावर कोसळलेल्या दुःखात दैनिक यशवंत परिवार सहभागी आहे.

# आज दि.लिं. होळीकर प्रतिष्ठानच्या वतीने गुणगौरव सोहळा

**उदगीर (प्रतिनिधी)** (दि. २०, उदगीर) आज उद्यगिरी लॉयन्स नेत्ररुग्णालयसभागृहात दि.लिं. होळीकर प्रतिष्ठानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे दहावी, बारावी बोर्डाच्या परीक्षेत उदगीरमधीत प्रत्येक शाळेतील सर्वप्रथम आलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा व उदगीर परिसरातील स्पर्धा परिक्षेत उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला आहे. या समारंभाचे अध्यक्ष उद्यगिरी लॉयन्स नेत्र रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. रामप्रसाद लखोटीया हे असणार आहेत तर प्रमुख पाहुणे म्हणून उदगीरचे उपजिल्हाधिकारी मा. सुशांत शिंदे व तहसीलदार मा. राम बोरगांवकर हे राहणार आहेत. हे अधिकारी नुकतेच स्पर्धा परीक्षा देऊन आलेले असल्यामुळे प्रत्यक्ष अनुभव असणाऱ्याचे मार्गदर्शन लाभणार आहे. म्हणून उदगीर शहरातील सर्व गुणवंत विद्यार्थी, पालक व सुजाण प्रतिष्ठित नागरिकांची या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा अशी विनंती दि.लिं.होळीकर प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात येत आहे.

# भाजप युवा मोर्चा व महिला मोर्चच्या वतीने नाना पटोले यांचा जाहीर निषेध




**उदगीर (प्रतिनिधी)** भारतीय जनता युवा मोर्चा व महिला मोर्चा च्या वतीने काँग्रेस प्रदेश अध्यक्ष नाना पटोले यांचा छत्रपती शिवाजी चौक उदगीर येथे जाहीर निषेध करण्यात आला

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी जइउ समाजातील बांधवाला पाय धुण्यास सांगितले. जइउ समाजातील व्यक्तीकडून नाना पटोले यांनी पाय धुवून घेतले.

निवडणुकीत संविधान बदलणार म्हणून, काँग्रेसने दलितांची दिशाभूल केली ते याचसाठी दलितांनी काँग्रेसचे गुलाम राहावं यामागचा उद्देश

युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष अमोल निडवदे, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष उत्तराताई कलबुर्गे, भाजपा शहरध्यक्ष मनोजदादा पुदाले यांच्या नेतृत्वामध्ये निषेध आंदोलन करण्यात आले यावेळी युवा मोर्चा शहरध्यक्ष रामेश्वर,युवा मोर्चा जिल्हाप्रसिद्धी प्रसाद नाईकवाडे, जिल्हा उपाध्यक्ष परमेश्वर बिरादार, जिल्हा सचिव मन्मथ भुसारे, जिल्हा उपाध्यक्ष शरद पांचाळ, जिल्हा उपाध्यक्ष संतोष केसगिरे, महिला मोर्चाचे अनिता नेमताबादे, सरोजा वारकरे, मंदाकिनी जिवणे, युवा मोर्चा शहर उपाध्यक्ष आकाशसावरगावे,युवा मोर्चा उपाध्यक्ष साई वाघमोडे, युवा मोर्चा सचिव सुनिल फफाळ, युवा मोर्चा चिटणीस प्रदीप (लालू )वाडेकर, सोशल मीडिया प्रमुख संतोषबिरादार,विध्यार्थी आघाडी सहप्रमुख प्रसाद पांढरे, विध्यार्थी आघाडीसचिव अभिषेक एनीले ,बळीराम कुंभार,शिवसांब बिरादार, ओंकार खंदाडे, कृष्णा श्रीमंडळे, दयानंद देशमुख आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिव्हाळा ग्रुपचे प्लास्टिकमुक्त अभियान सुरु



**उदगीर (प्रतिनिधी)** येथील जिव्हाळा ग्रुपने सुरू केलेल्या प्लास्टिक मुक्त अभियानाची सुरुवात बुधवारी कापडी पिशव्यांचे वाटप करून व उदगीरच्या सार्वजनिकस्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी आलेल्या प्रेतांची सेवा करणारे गोविंदराव गायकवाड यांचा सत्कार करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिव्हाळा ग्रुपचे सचिव लक्ष्मीकांत बिडवई होते.तर कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मनोहरराव कुलकर्णी अतनूरकर,व्ही. एस. कुलकर्णी होते.यावेळी सार्वजनिकस्मशानभूमीत अंत्यसंस्कारासाठी आलेल्या प्रेतांची सेवा करणारे गोविंदराव गायकवाड व विविध क्षेत्रात काम करणारे चंद्रकांत रोडगे यांचा सत्कार यावेळी करण्यात आला.यावेळी जिव्हाळा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष विश्वनाथ मुडपे, माजी अध्यक्ष देविदास नादरगे, अध्यक्ष रमाकांत बनशेळकीकर, विश्वनाथ बिरादार माळेवाडीकर गोविंद निटूरे यांची समयोचित भाषणे झाली. या कार्यक्रमासाठी सतीश कुलकर्णी, नवनाथ पाटील, मारोती रोडगे , सोपानराव माने , हरिश्चंद्र वड्डमवार ,चंद्रकांत पांचाळ, हावगीराव आचारे,चंद्रकांत उप्परबावडे ,विक्रम हलकीकर,सुधीर वाडेकर, चारुदत्त वाडेकर यांनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन दशरथ शिंदे यांनी तर आभार प्रदर्शन शरणप्पा खेळगे यांनी केले.

# विविध उपक्रमाने उदगीर तालुका माहेश्वरी सभे तर्फे महेश नवमी साजरी




**उदगीर (प्रतिनिधी)** उदगीर तालुका माहेश्वरी सभे तर्फ्रे आरोग्य तपासणी ,रक्तदान , नेत्र तपासनी शिबिरासह विविध उपक्रम घेऊन माहेश्वरी समाजाची उत्पत्ती दिन महेश नवमी साजरी करण्यात आली

उदगीर तालुका माहेश्वरी सभा उदगीर तर्फ्रे माहेश्वरी समाजाचे उत्पत्ती दीन महेश नवमी मोठया उत्साहात साजरी करण्यात आली, या महेश नवमी निमित्त उदगीर तालुका माहेश्वरी सभे तर्फ्रे समाजाच्या परिवारातील प्रत्येकाचे आरोग्य तपासणी, रक्त तपासणी, डोळे तपासणी सह रक्तदान शिबिर घेण्यात आले या रक्तदान शिबिरात ५४ रक्तदात्याणी स्वचेने रक्तदान केले, आरोग्य तपासणी साठी डॉ रामप्रसाद लखोटिया, डॉ प्रवीण मुंदडा, नेत्र चिकित्सा साठी उदायगिरी नेत्र रुग्णालयाचे ईश्वरप्रसाद बाहेती,गणेशमुंडे,राहुल अलमकेरे, तेजस सर्वोदय,प्रशांत पाटील, श्रीकांत सावंत, सुमित आपटे,रक्तदान शिबिरासाठी अंबरखाने रक्त पेढी चे डॉ विश्वनाथ चिकमुर्गे,सचिन कोणाळे,अविनाश बिरादार, सपना कांबळे, श्रद्धा असुरे,संगमेश,बालाजी , विनायकमामा यानी विशेष परिश्रम घेऊन शिबिर संपन्न झाले सायंकाळी ६ वाजता श्री लक्ष्मीनारायण मंदिर येथे भगवान महेश चि आरती करुण महाप्रसादी देण्यास आली, समाजातील ९०% पुढें मार्क घेणाऱ्या विद्यार्थ्याचां सत्कार करण्यात आला,महेश नवमी साजरी करण्यासाठी उदगीर तालुका माहेश्वरी सभे चे अध्यक्ष श्रीनिवास सोनी, सचिव राजगोपाल मणियार, सत्यनारायण सोमाणी, डॉ प्रवीण मुंदडा,शिरीष नावंदर, विष्णूदास लोया,राजेश सारडा, श्रीराम सारडा, आनंद बजाज,मार्गदर्शक डॉ रामप्रसाद लखोटिया, ईश्वर प्रसाद बाहेती, अशोक बाहेती, राम विलास नावंदर, कमल किशोर बाहेती, अनील मालू,मारवाडी युवा मंच चे पवन मुंडदा,कैलाश मालू, लक्ष्मिकांत सोमाणी, अमर सारडा,उमेश कालाणी, प्रणव बागडी,रुपेश राठी, रौनक अगरवाल, निखिल बाहेती,हरीश इनानी, श्रीकांत सोमाणी,योगेशलोया,शुभम लोया, कृष्णा काबरा ,रामानुज मोदानी, देविदास बजाज,राजेश पारिख,रुपेश गिल्डा पन्नालाल बजाज, यानी विशेष परिश्रम घेऊन महेश नवमी मोठ्या उत्साहात साजरी केली

# सैनिकी विद्यालयात पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत व पाठ्यपुस्तके वाटप

**उदगीर (प्रतिनिधी)** श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच्छ,चॉकलेट आणि पाठ्यपुस्तके देऊन करण्यात आले.शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या वर्षाची सुरुवात दि. १५ जून २०२४ पासून झाली आहे. शासनाच्या धोरणानुसार विद्यार्थ्यांचे स्वागत करुन त्यांना मोफ्फत पाठ्यपुस्तके वाटप करण्यात आली. विद्यालयातील ग्रंथपाल विजय कावळे यांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके वाटप केली. यावेळी त्यांना हाऊस मास्टर बालाजी मुस्कावाड, संतोष चामले, प्रा. युवराज दहिफ्फळे, मारोती मरकवाड, विनायक करेवाड, बालाजी कांबळे यांनी मदत केली.विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सैनिकी विद्यालयात विविध उपक्रम राबविले जातात. विद्यार्थ्यांच्या अंगात शिस्त, संस्कार, राष्ट्रप्रेम, राष्ट्रनिष्ठा, सहकार्य ही भावना निर्माण करण्यासाठी शालेय प्रार्थनेत परिपाठाच्या माध्यमातून मार्गदर्शन केले जाते. यावेळी विद्यार्थ्यांचे स्वागत प्राचार्य वसंत कुलकर्णी,पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विद्यालयातील सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. विद्यालयात प्रथम प्रवेश करणारा विद्यार्थी किरन नारायणपुरे हा आहे.